


महाराष्ट्र
# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र
वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड १, अंक २ — जुलै २०२० (क्र.२)


## अनुक्रमणिका


या नव्या बातमीपत्राविषयी ३

**संपादकीय**

पालथ्या घड्यावर... ४

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ५

गौताळा औट्रमघाट अभयारण्यात यंदा फक्त ट्रॅप कॅमेरे वापरून प्राणिगणना

टिपेश्वर अभयारण्य ५

टाळेबंदीच्या काळात टिपेश्वर अभयारण्यात शिकार

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ५

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची अधिसूचना जारी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतचे बंदर कोळसा क्षेत्र रद्द

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघाच्या शिकारीचे जुने प्रकरण उघड

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघीण व बछड्यांची विष घालून हत्या; प्रकल्पाधिकाऱ्यांवर टीकेची झोड

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातून पकडलेल्या वाघाचा बचाव केंद्रात मृत्यू

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ११५ वाघ व १५१ बिबटे

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ७

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील एन-१ वाघीण जेरबंद

नांदुरमधमेश्वर अभयारण्य ८

नांदुरमधमेश्वर अभयारण्याचा 'रामसर' दर्जा टिकविण्याचे आव्हान

नांदुरमधमेश्वर अभयारण्यातील नदीपात्रात मृत मासे

बोर व्याघ्र प्रकल्प ८

बोर व्याघ्र प्रकल्पात तपकिरी रंगाचे अस्वल

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ९

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात कॅमेरा ट्रॅपमुळे शिकाऱ्यांना पकडण्यात वन विभागाला यश

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात टाळेबंदीत वन्यप्राण्यांचा मुक्त संचार; हरणांचा मृत्यू

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात एका रात्रीत १७ हजारांहून अधिक प्राण्यांचे दर्शन

टाळेबंदीत ४० वनाधिकारी, कर्मचाऱ्यांचे मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सहभोजन!

मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासनाच्या टाळेबंदीतील उपाययोजना इतरांसाठी मार्गदर्शक

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात महाशीर माशाचे उत्पादन

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पांढरे अस्वल

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वाघाचा मध्य प्रदेशाच्या हद्दीत मृत्यू; घटनास्थळी लागलेल्या आगीमुळे प्रकरणाला गंभीर वळण

यावल अभयारण्य ११

यावल अभयारण्यात शिकाऱ्यांचा वनकर्मचाऱ्यांवर गोळीबार

लोणार अभयारण्य १२

लोणार अभयारण्यातील सरोवराच्या पाण्याला लाल रंग; कारणमीमांसेसाठी पाण्याची तपासणी

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प १२

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात शिकाऱ्यांना वन विभागाच्या कुत्र्याची दहशत

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प/राधानगरी अभयारण्य १२

सह्याद्रीच्या संवेदनशील क्षेत्रातून गावे न वगळण्याची सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाधिकाऱ्यांची विनंती

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान १३

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बेकायदा वृक्षतोड व अतिक्रमणावर कारवाई

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर, तुंगारेश्वरवर भागांवर ड्रोनची नजर

ज्ञानगंगा अभयारण्य १३

'टी१सी१' वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावला

**राज्यस्तरीय बातम्या**
राज्यात आंतरजिल्हा प्रवासावर बंदी असताना वन्यजीव पर्यटनाला सुरुवात १४
कोकणातील तिल्लारीच्या जंगलाला ‘संवर्धन राखीव क्षेत्रा’चा दर्जा १४
दहा दिवसांत महाराष्ट्रात पाच वाघांचा मृत्यू १५
समृद्धी द्रुतगती महामार्गावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी काही उपाययोजनांनाच मान्यता १५
दुर्मीळ सागरी प्राण्यांच्या संरक्षणासाठी नुकसानभरपाई योजना १६
काळविटांच्या अधिवासाचा ऱ्हास १६
अस्वलाच्या हल्ल्याच्या दोन घटनांमध्ये एक ठार, दोन जखमी १७
चंद्रपूर शहरात अस्वलाची भटकंती १७
मालेगावात गिधाड दिसले १७
साप व कासवाची तस्करी करणाऱ्यांना दोन पोलिसांची साथ १७
चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या स्थलांतराबाबत चर्चा; स्थानिक वनाधिकारी अनभिज्ञ १८
कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीमुळे बुद्ध पौर्णिमेची लोकसहभागातून प्राणिगणना यंदा रद्द १८
**माणूस-बिबट्यासंबंधी वृत्त**
**अमरावती जिल्हा** १८
जखमी बिबट्याला पकडण्यात यश; सहा आरोपींना अटक
**गेल्या तीन महिन्यांतील काही घटना** १९
**औरंगाबाद जिल्हा** १९
बिबट्याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयासह वन विभागाला उच्च न्यायालयाची नोटीस
**चंद्रपूर जिल्हा** २०
बिबट्या मृत्यू प्रकरणी १९ जणांना अटक
**राष्ट्रीय बातम्या**
प्राणिसंग्रहालये व संरक्षित क्षेत्रे आर्थिक अडचणीत २०
पर्यावरण संरक्षणाचे निकष डावलून विकास प्रकल्पांना मंजुरी २१
टाळेबंदीत भारतात शिकारीच्या प्रकरणांत दुप्पट वाढ २१
व्याघ्र प्रकल्पांसह इतर संस्थांना सावधानतेचा इशारा २१
**वाचकपत्रे** २२
**दृष्टीकोन** २४
गोड्या पाण्यातील कासवाचे संवर्धन

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड १, अंक २, जुलै २०२० (क्र. २)**

संपादकः रेश्मा जठार

सहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

सहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः Ashvini Menon Visual Design Studio (AMVDS)

प्रकाशकः कल्पवृक्ष

संपादकीय पत्ताः C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

दूरभाष/फॅक्सः ०२० २५६५४२३९

**ई मेलः**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळः** http://kalpavriksh.org

***

टीपः ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिक सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

## या नव्या बातमीपत्राविषयी

**‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र’** या वन्यजीवविषयक त्रैमासिक बातमीपत्राची संकल्पना ‘पीए अपडेट’ अर्थात ‘प्रोटेक्टेड एरिआ अपडेट’ या इंग्रजी द्वैमासिक बातमीपत्रावर आधारलेली आहे. ‘कल्पवृक्ष’ ही बिगर-सरकारी संस्था गेली २५ वर्षे सातत्याने ‘पीए अपडेट’ प्रकाशित करत आहे. हे नवे त्रैमासिकही ‘कल्पवृक्ष’च्या पुढाकाराने सुरू होत आहे.

प्रोटेक्टेड एरिआज् म्हणजे १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत अधिसूचित केलेली संरक्षित क्षेत्रे; त्यामध्ये वन्यजीव अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने, व्याघ्र प्रकल्प, संवर्धन राखीव क्षेत्रे, लोकसमूहाची राखीव क्षेत्रे यांचा समावेश होतो. भारतीय उपखंडातील संरक्षित क्षेत्रांशी संबधित घटना जसे की या क्षेत्रांची निर्मिती किंवा पुनर्रचना, त्यांच्या संरक्षण, संवर्धनात येणाऱ्या अडीअडचणी, आव्हाने, या क्षेत्रांवर बरेवाईट परिणाम करू शकतील असे धोरणात्मक निर्णय, वन्यजीवविषयक अभ्यास, संशोधन याविषयी प्रामुख्याने इंग्रजीतील काही दैनिकांत (अलीकडे त्यांच्या संकेतस्थळांवर) प्रकाशित झालेल्या निवडक बातम्यांचे संकलन व त्यांवर संपादनाचे सोपस्कार करून प्रत्येक बातमीच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत देऊन त्या ‘पीए अपडेट’मध्ये दिल्या जातात.

वन्यजीवविषयक अभ्यासक, संशोधक, शिक्षक, विद्यार्थी, वनाधिकारी व कर्मचारी आणि पर्यावरण, वन्यजीव व आदिवासी-हित विषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते यांचा ‘पीए अपडेट’च्या वाचकवर्गात समावेश आहे.

‘पीए अपडेट’ इंग्रजी भाषेत असल्यामुळे त्याला इतर प्रादेशिक भाषकांपर्यंत, विशेषतः भारतातील संरक्षित क्षेत्रांजवळ राहणाऱ्या वाचकांपर्यंत पोहोचण्यात भाषेची मर्यादा आड येते. संरक्षित क्षेत्रांच्या परिसरात, जवळपास राहणारे बहुसंख्य लोक हे प्रादेशिक भाषक आहेत. संरक्षित क्षेत्रांमध्ये दररोज फिरून काम करणारा वन विभागाचा बहुसंख्य कर्मचारी वर्ग हा प्रादेशिक भाषक आहे. आजच्या सामाजिक, आर्थिक पार्श्वभूमीवर संरक्षित क्षेत्रांचे महत्त्व, त्यांच्या समोरील आव्हाने संरक्षित क्षेत्रांशी थेट व जवळून संबंधित असलेल्या लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रादेशिक भाषांना पर्याय नाही. या जाणिवेतून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित बातम्यांचे ‘पी.ए. अपडेट’सारखे बातमीपत्र मराठी भाषेत प्रकाशित करण्याचे ‘कल्पवृक्ष’ने ठरवले आहे.

मराठी व इंग्रजी वृत्तपत्रे, नियतकालिके यामध्ये प्रकाशित झालेल्या महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांशी संबंधित निवडक बातम्या संकलन, संपादन करून **‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’**त दिल्या जाणार आहेत. प्रत्येक बातमीबरोबर तिच्या मूळ प्रकाशनाचा स्रोत त्यात दिला जाणार आहे.

‘पीए अपडेट’ आणि प्रस्तुत मराठी बातमीपत्र ही दोन्ही परिपूर्ण नाहीत, याची आम्हाला जाणीव आहे. खेरीज, एकदा प्रकाशित झालेल्या बातम्या पुन्हा देण्याचे प्रयोजन काय, असा प्रश्न वाचकांना पडू शकतो. या बातमीपत्रांचा हेतू असा की वन्यजीवांसाठी संरक्षित क्षेत्रातील घडामोडींविषयी बातम्या एकत्र पाहण्याचा पर्याय उपलब्ध असावा. तसेच, इंग्रजीतील बातमीपत्र जवळपास दोन दशके सातत्याने प्रकाशित होत असल्यामुळे या काळात इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये संरक्षित क्षेत्रांविषयीचे वृत्तांकन कसे होते, त्यात काही बदल झाले का याचे दस्ताऐवजीकरण आपोआपच या बातमीपत्राच्या रुपाने उपलब्ध झाले आहे. तसे, महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रांविषयीच्या वृत्तांकनाचेही व्हावे, अशी अपेक्षा आहे. मुख्य म्हणजे, ही सुरुवात आहे. वन्यजीव संरक्षणाबाबत अशी बातमीपत्रे जास्तीत जास्त प्रादेशिक भाषांमध्ये प्रकाशित झाली तर हवी आहेतच.

तेव्हा, **‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र’** कसे वाटले या विषयी तुमचा अभिप्राय, मते, सूचना आम्हाला जरूर कळवा. तुमच्या संपर्कातील विद्यार्थी, शिक्षक, वार्ताहर, पर्यावरण-वन्यजीव प्रेमी व या विषयात रुची असणारे इतर वाचक, कार्यकर्ते, संरक्षित क्षेत्रांच्या परिसरातील विद्यार्थी, वाचक व इतर रहिवासी यांच्यापर्यंत हे बातमीपत्र पोहोचावे, असे तुम्हाला वाटत असेल तर त्या सर्वांचे ईमेल, पत्ते आणि संपर्क क्रमांक आम्हाला पाठवा. या वर्षातील चार अंक त्यांना पाठवण्याची व्यवस्था आम्ही करू. तसेच, तुम्ही स्वतः शिक्षक, पत्रकार, कार्यकर्ते असाल आणि जनजागृतीसाठी या बातमीपत्राचा उपयोग करण्याची तुमची इच्छा असेल तर त्यासाठी तुमची योजना, तुम्हाला लागणाऱ्या प्रतींची संख्या आणि तुमचा पत्ता आम्हाला कळवा. त्या तुमच्यापर्यंत पोहोचविण्याची व्यवस्था आम्ही करू.


**अधिक माहिती व संपर्कासाठीः**


महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

c/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा,

९०८, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

फॅक्सः ०२० २५६५४२३९.

ई-मेलःmarathipaupdate@gmail.com

## संपादकीय

### पालथ्या घड्यावर...

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या पहिल्या अंकाचे प्रकाशन कोविड-१९च्या साथीला आळा घालण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीच्या सुरुवातीला झाले; तर दुसऱ्या अंकाची निर्मिती प्रक्रियाही टाळेबंदीत झाली. साहजिकच या अंकात अनेक बातम्या टाळेबंदीचे परिणाम दर्शविणाऱ्या आहेत. या काळातील वृत्तांकन हे एकीकडे, माणसाच्या अनुपस्थितीत मानवनिर्मित अधिवासात वावरण्याच्या वन्यजीवांच्या क्षमता आणि मर्यादांकडे लक्ष वेधणारे; तर दुसरीकडे, आपल्या समाजाच्या वन्यजीव व एकूणच पर्यावरणाकडे पाहण्याच्या आत्मघातकी वृत्तीची बोचरी जाणीव करून देणारे आहे.

टाळेबंदीमुळे माणसाचा घराबाहेरचा वावर थांबला. संरक्षित क्षेत्रांमध्ये पर्यटक, स्थानिकांची गर्दी, वाहनांची रहदारी नसल्यामुळे वन्यप्राणी रस्त्यांवर, बफर क्षेत्रातील गावांजवळ मोकळेपणाने वावरताना दिसून आले. संरक्षित क्षेत्रांव्यतिरिक्त इतरत्रही वन्यप्राण्यांचा मोकळा वावर दिसून आला. वाघ, अस्वल, हरणे आदी प्राण्यांनी दाट लोकवस्तीत संचार केला. या घटनांवर निसर्गाने, वन्यप्राण्यांनी आपली हक्काची जागा परत मिळवली वगैरे प्रतिक्रिया नोंदवण्यात आल्या. मात्र, या प्रकाराला तात्पुरता व क्षुल्लक बदल या पलीकडे काहीही अर्थ नाही. वन्यप्राण्यांना अधिवास उपयुक्त तेव्हा ठरतो, जेव्हा त्यांना त्यांच्या मूलभूत गरजांची पूर्तता त्या अधिवासातून करता येते. या उलट, टाळेबंदीच्या काळात झाले असे की मानवी अधिवासातील रचना, व्यवस्थांमुळे तिथे शिरलेले काही प्राणी जखमी झाले व काही ठार झाले.

लोकवस्तीत शिरलेल्या हरणांचा कुत्र्यांच्या हल्ल्यात झालेला मृत्यू हा प्राण्यांच्या स्वभावाचा भाग मानता येईल. पण दुचाकीवरून पाठलाग करून हरणाला पळायला भाग पाडून ठार करणे, ही माणसाची विकृती आहे. टाळेबंदीशी थेट संबंध नसलेल्या एका बातमीचा उल्लेख इथे आवश्यक वाटतो. ताडोबाच्या बफर क्षेत्रात बछड्यांसह वाघीण आढळल्यावर वन विभागाची गस्त वाढेल. त्यामुळे बेकायदा दारूविक्री बंद करावी लागेल, या विचाराने बछड्यांसह वाघिणीला ठार केल्याची बातमी. ही बातमी वाचून केरळमधील हत्तिणीचा स्फोटकांमुळे झालेला मृत्यू आठवला. या घटना वन्यजीवांविषयी आपल्या जनमानसातील असंवेदनशीलतेची अस्वस्थ करणारी उदाहरणे आहेत.

टाळेबंदीत तस्करीखेरीज खाण्यासाठी, रिकामा वेळ घालविण्यासाठी प्राण्यांच्या शिकारी झाल्याचे दिसून आले. या काळात राज्यासह देशभरात शिकारींचे प्रमाण वाढल्याची नोंद झाली आहे. मात्र, ही वाढ खरोखरीच टाळेबंदीतील परिस्थितीमुळे झाली आहे की या काळात शिकारीच्या घटनांची मोठ्या प्रमाणावर दखल घेतली गेल्यामुळे नव्याने लक्षात आलेली जुनीच बाब आहे, हे तपासण्याची गरज आहे.

टाळेबंदीत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाने ऑनलाइन ताडोबा दर्शनाचा उपक्रम राबविला. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत प्रकल्पातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा वेळ जातो व त्यांचे वन्यजीव संरक्षणाच्या मुख्य कामाकडे दुर्लक्ष होते, अशी टीका झाली. मात्र, संरक्षित क्षेत्रांमध्ये गर्दी न करता वन्यजीव पाहण्याचा एक नवा पर्याय यामुळे समोर आला. अर्थात हा पर्याय आणि पर्यटकांची प्रत्यक्ष उपस्थिती या दोहोंचे वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने फायदे व तोटे काय आहेत हे सुज्ञांना सांगणे न लगे!

टाळेबंदीत राज्य शासनाने सह्याद्रीच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील भागातून आणखी काही भाग वगळण्याचा प्रस्ताव केंद्राला दिला; तर केंद्राने वाघांच्या संचारपट्ट्यात खाणकामाचा मार्ग मोकळा करण्याचा पुन्हा नव्याने प्रयत्न केला. एकूणच मानवी समाजासाठी कठीण अशा या काळातही प्रकल्पांना सरकारची पर्यावरणीय मंजुरी देण्याची प्रक्रिया दूरसंवादाच्या माध्यमांद्वारे सुरूच होती. पर्यावरणीय मंजुरीच्या प्रक्रियेकडे एरवीही औपचारिकता म्हणून पाहिले जाते. त्यामुळे या खेपेला मंजुरी देण्याची प्रक्रिया झटपट उरकून टाकायला टाळेबंदीचे कारण आयतेच मिळाले.

भारतातील टाळेबंदीपूर्वी पण जगात इतरत्र कोरोना विषाणूचा प्रसार जोर धरू लागलेला असताना केंद्र सरकारने पर्यावरणीय मंजुरीविषयक कायदेशीर तरतुदीत बदल प्रस्तावित केले. त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच देशात टाळेबंदी लागू झाली. एकीकडे टाळेबंदीमुळे हवा, पाणी व ध्वनी प्रदूषण कमी होत होते, मानवी वावर कमी झाल्याचे सकारात्मक परिणाम वन्यप्राण्यांच्या वागणुकीवर दिसू लागले होते. पर्यावरण संरक्षण संवर्धनाच्या नव्या शक्यता समोर येत होत्या; त्याचवेळी कोविड-१९ची साथ गंभीर रूप धारण करू लागली होती. अशा साथीला तोंड देण्यासाठी आपल्या देशातील आरोग्य सेवेसह इतर सरकारी यंत्रणाही तयार नाहीत हे लक्षात येऊ लागले होते. अशा वेळी संकटातील संधी मानून योग्य दिशेला पावले टाकण्याऐवजी सरकारने आर्थिक विकासाला प्राधान्य दिले. त्याचबरोबर, सगळ्या नव्या शक्याशक्यता नजरेआड करून पर्यावरणविषयक धोरणही आहे तसेच राहील, याची प्रचीती दिली.

कोविड-१९च्या अनुभवामुळे सजीव-निर्जीवाच्या सीमारेषेवरील एक अतिसूक्ष्म घटक माणसाच्या जीवनात प्रचंड

उलथापालथ घडवून आणू शकतो याची भीती माणसाच्या मनात काही काळ राहील. पण म्हणून या भीतीपोटी तो वन्यजीव व पर्यावरणाकडे संवेदनशीलपणे पाहू लागेल, अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल.

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### गौताळा औट्रमघाट अभयारण्य

#### गौताळा औट्रमघाट अभयारण्यात यंदा फक्त ट्रॅप कॅमेरे वापरून प्राणिगणना

कोरोना विषाणूच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीमुळे बुद्ध पौर्णिमेच्या रात्री होणारी वन्यप्राण्यांची गणना यंदा रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. त्यामुळे, गौताळा औट्रमघाट अभयारण्यात प्रथमच ट्रॅप कॅमेऱ्यांद्वारे दोन ते तीन दिवस प्राणिगणना करण्याचे अभयारण्य व्यवस्थापनाने ठरविले.

हिवरखेडा विभागातील चंदन नाला, नाटी, भगदरा परिसरातील पाणवठ्यांवर ट्रॅप कॅमेऱ्यांमध्ये बिबट्या (leopard), कोल्हा (fox/jackal), नीलगाय (bluebull), हरीण (deer), साळींदर (porcupine), मोर (peacock), रानडुक्कर (wild boar) हे प्राणी मागील काही दिवसांत आढळून आले आहेत.

**सूत्र** – 'बुद्ध पौर्णिमेला यंदा प्रथमच ट्रॅप कॅमेऱ्याद्वारे वन्यप्राणी गणना', https://maharashtratimes.indiatimes.com, ०८.०५.२०२०.

### टिपेश्वर अभयारण्य

#### टाळेबंदीच्या काळात टिपेश्वर अभयारण्यात शिकार

टिपेश्वर अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी तीन शिकारी शस्त्रांसह पकडले गेले; तर महिनाभरातच वन्यप्राण्यांच्या शिकारीसह इतर वनगुन्हे उघडकीस आले आहेत. यंदा टाळेबंदीमुळे वन खात्याने पाणवठ्यावरील वन्यप्राणी निरीक्षणाचा 'निसर्गानुभव' हा कार्यक्रम रद्द केल्याचा गैरफायदा शिकाऱ्यांनी घेतल्याचे दिसून आले.

रोजगार नसल्याने, करमणुकीसाठी, बकऱ्याच्या मटणाचे भाव वाढले म्हणून शिकार केली जात असल्याचे समोर आले आहे.

प्रादेशिक विभागाचे एक अधिकारी पाणवठ्याजवळ मचाणावर असताना त्यांना तीन व्यक्ती संशयास्पदरित्या फिरताना दिसल्या. त्यांनी तातडीने भ्रमणध्वनीवरून कार्यालयात संदेश पाठवला. दरम्यान ते तिघे दर्यापूर, ठाणेगाव, पिंटापुंगरी, वडवाट, खरी या गावांच्या दिशेने गेले. या माहितीच्या आधारे वनाधिकारी, कर्मचाऱ्यांनी तिघा संशयितांना वडवाट गावातील त्यांच्या घरातून चौकशीसाठी ताब्यात घेतले. तेव्हा एका संशयिताच्या घरातून चितळाचे शिंग, मोरांची पिसे, सत्तुर, सुरी, भाले, शिकारीचे जाळे आदी साहित्य मिळाले. दुसऱ्या संशयिताच्या घरात मोराची पिसे सापडली.

**सूत्र** – 'वनमंत्र्यांच्या जिल्ह्यातच शिकारी वाढल्या', https://www.loksatta.com, १७.०५.२०२०.
'मानव-वन्यजीव संघर्षासह शिकारीत वाढ', https://www.loksatta.com, ०९.०५.२०२०.

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

#### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची अधिसूचना जारी

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची अंतिम अधिसूचना केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाने जूनअखेरीस जारी केली.

अंतिम अधिसूचनेनुसार, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या चारही बाजूला तीन किमी ते १६ किमीपर्यंत पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राचा विस्तार करण्यात आला आहे. १३४६.६१ चौ. किमीचे हे क्षेत्र आहे. अंतिम अधिसूचनेत बंदर गाव आणि प्रस्तावित बंदर खाणीचे क्षेत्र हे पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात आले आहे. पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात कोणत्याही प्रकारच्या खाणकामाला परवानगी देता येणार नाही, असे या अधिसूचनेत नमूद केले आहे. त्यामुळे केंद्रीय कोळसा मंत्रालयापाठोपाठ आता पर्यावरण मंत्रालयाने पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राच्या अधिसूचनेच्या माध्यमातून बंदर कोळसा खाण नाकारली आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची पहिली अधिसूचना जुलै २०१८ मध्ये निघाली होती. त्यानंतर सप्टेंबर २०१९ मध्ये अंतिम अधिसूचना निघाली असली तरीही ती कागदोपत्री प्रकाशित झाली नव्हती. टाळेबंदीनंतर ती आणखी रखडली. अखेर, आता ती मंत्रालयाने जारी केली आहे.

**सूत्र** – 'पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात खाणकामास बंदी', https://www.loksatta.com, ०१.०७.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पालगतचे बंदर कोळसा क्षेत्र रद्द

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ असलेले बंदर कोळसा क्षेत्र लिलावाच्या यादीतून वगळण्याचा निर्णय केंद्रीय कोळसा मंत्रालयाने घेतला.

बंदर कोळसा क्षेत्राबाबत विविध मुद्द्यांची बारकाईने तपासणी केल्यानंतर हा निर्णय घेतल्याचे केंद्रीय कोळसा, खाणकाम व संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी सांगितले.

कोळसा मंत्रालयाने देशातील ४१ कोळसा क्षेत्रांचा समावेश असलेली लिलावासाठीची यादी १८ जून रोजी जाहीर केली. त्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ असलेल्या बंदर कोळसा क्षेत्राचा समावेश होता.

हा भाग ताडोबा अंधारी व्याघ्र अधिवासाला नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील इतर व्याघ्र अधिवासांशी जोडणाऱ्या वन्यजीव संचारमार्गात येतो. इथे खाणकाम केल्यास व्याघ्र संवर्धनाला धोका पोहोचेल व चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वन्यप्राणी संघर्षाची तीव्रता वाढेल, अशी भूमिका पर्यावरणवाद्यांनी मांडली होती. एका कार्यकर्त्याने या संदर्भात न्यायालयात धाव घेतली. त्याचबरोबर, माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री जयराम रमेश, राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी बंदर कोळसा क्षेत्र लिलावाच्या यादीतून वगळावे, अशा आशयाची पत्रे पाठवली होती.

यापूर्वी १९९९ व २००९ मध्ये या क्षेत्राचे प्रस्तावित लिलाव नेमके याच कारणांनी विरोध झाल्यामुळे रद्द करण्यात आले होते.

**सूत्र** – विवेक देशपांडे, 'आफ्टर एक्टिविस्ट्स रेझ इकॉलॉजिकल कन्सर्न्स, बंदर कोल ब्लॉक स्ट्रक ऑफ ऑक्शन लिस्ट', www.indianexpress.com, ३०.०६.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील वाघाच्या शिकारीचे जुने प्रकरण उघड

चंद्रपूर वन विभागाने पडोली-घुग्घुस मार्गावर वाघांच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या तीन आरोपींना जून महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात ताब्यात घेतले. त्यांची झडती घेतली असता त्यांच्याजवळून वाघाची सहा हाडे, सहा मिशा व पाच नखे मिळाली. हे अवशेष आणि आरोपींचे वाहन वन विभागाने जप्त केले.

या तिन्ही आरोपींची कसून चौकशी केली असता चार वर्षांपूर्वी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील शेतशिवारात विद्युत प्रवाह सोडून वाघाची शिकार केल्याची कबुली आरोपींनी दिली. त्यांनी बफर क्षेत्रात नियतक्षेत्र हळदी इथे वाघाचा मृतदेह पुरला होता. या ठिकाणी खोदून वन विभागाने वाघाची हाडे जप्त केली व या प्रकरणी एकूण नऊ आरोपींना अटक केली आहे.

**सूत्र** – 'वाघाच्या अवयव तस्करीतून उलगडले चार वर्षांपूर्वीचे व्याघ्र शिकार प्रकरण', https://www.loksatta.com, १९.०६.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र पकल्पातील वाघीण व बछड्यांची विष घालून हत्या; प्रकल्पाधिकाऱ्यांवर टीकेची झोड

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील मोहर्ली वन परिक्षेत्रात जूनच्या दुसऱ्या आठवड्यात चार दिवसांच्या अंतराने वाघीण व दोन बछड्यांसह दोन माकडांचे कुजलेले मृतदेह आढळले. हे मृत्यू विषबाधेने झाल्याचा प्राथमिक अंदाज खरा ठरला आहे. परिसरात वाघाचा वावर असल्याचे कळले तर वन विभागाची नियमित गस्त होईल आणि आपला अवैध मद्यव्यवसाय धोक्यात येईल, या भीतीने दारू विक्रेत्यांनी विषप्रयोग करून या हत्या केल्याचे उघड झाले.

या प्रकरणी बफर क्षेत्रातील कोंडेगाव शेतशिवारातील तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींनी मृत डुकरावर व मोहाच्या फुलांवर विष टाकले. वाघीण व बछड्यांनी डुकराचे मांस खाल्ल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता.

वाघिणीचा मृत्यू झाल्यानंतर ताडोबा व्यवस्थापनाला ही माहिती चारपाच दिवसांनी मिळाली. त्यामुळे ताडोबाच्या क्षेत्र संचालकांवर वन्यजीवप्रेमींकडून टीका होत आहे की टाळेबंदीत ताडोबातील पर्यटन बंद होते, वनकर्मचाऱ्यांची उपस्थिती कमी होती, अशा स्थितीत प्रत्यक्ष जंगलात संरक्षण, गस्त या बाबींकडे व्यवस्थापनाने लक्ष देणे आवश्यक होते; याउलट ताडोबाचे ऑनलाइन दर्शन घडविण्यासाठी दररोज वनाधिकारी व कर्मचारी चित्रीकरणात आणि ऑनलाइन चित्रफिती तयार करण्यात गुंतले होते; त्यामुळे वाघांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष झाले.

क्षेत्र संचालकांनी काही महिन्यांपूर्वी माणूस-वन्यजीव संघर्ष असलेल्या ७५ गावांमधील ग्रामस्थांचे विशेष व्याघ्र संरक्षण दल तयार केले होते. या सर्वांना आगरझरी इथे प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यानंतरही शिकारीच्या घटना कमी झालेल्या नाहीत. तेव्हा वन विभागाने पर्यटन सोडून सुरक्षेकडे अधिक लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे, असे मत वन्यजीवप्रेमींनी व्यक्त केले.

दरम्यान, मार्च महिन्यात ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील लोकप्रिय वाघीण माया (टी१२) हिने पाच; तर छोटी तारा (टी ७) हिने तीन बछड्यांना जन्म दिला आहे.

**सूत्र** – 'चंद्रपूरमध्ये वाघीण आणि दोन बछड्यांची हत्या', https://www.loksatta.com, १८.०६.२०२०.
गजानन झिलू सावंत, 'ताडोबात वाघाचे २ बछडे आढळले मृतावस्थेत; 'त्या' शक्यतेने खळबळ', https://maharashtratimes.indiatimes.com, १४.०६.२०२०.
'ताडोब्यात दोन बछड्यांचा मृत्यू', https://maharashtratimes.indiatimes.com, १५.०६.२०२०.
रवींद्र जुनारकर, 'वाघीण, बछड्यांच्या मृत्यूने वन खात्याच्या कारभारावर प्रश्नचिन्ह', https://www.loksatta.com, १६.०६.२०२०.
'चंद्रपूर : वाघीण आणि दोन बछड्यांवरील विषप्रयोग प्रकरणी तिघे ताब्यात', https://www.loksatta.com, १६.०६.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातून पकडलेल्या वाघाचा बचाव केंद्रात मृत्यू


ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कोलारा परिसरात हल्ले करणाऱ्या केटी-१ या वाघाला पकडून गोरेवाडा बचाव केंद्रात ठेवले होते. तिथे २२ जून रोजी त्याचा अचानक मृत्यू झाला.

कोलारा भागात लावण्यात आलेल्या कॅमेरा ट्रॅपच्या आधारे कोलारा भागात माणसांवर हल्ले करणारा एकच वाघ असून तो केटी-१ असल्याने निष्पन्न झाले होते. मे महिन्यात गाभा क्षेत्रात तेंदू पाने गोळा करण्यासाठी गेलेली एक महिला या वाघाच्या हल्ल्यात जागीच ठार झाली. त्या पूर्वी फेब्रुवारी महिन्यात शेतात जागलीसाठी गेलेल्या शेतकऱ्यावर हल्ला करून त्याला वाघाने ठार केले. एप्रिल महिन्यात मोहफुले वेचण्यासाठी जंगलात गेलेली एक महिलाही वाघाच्या हल्ल्यात ठार झाली.

या वाघाला जेरबंद करावे अशी मागणी ग्रामस्थांनी लावून धरली होती. वन विभाग वाघाला जेरबंद करणार नसेल तर आम्हीच त्याचा बंदोबस्त करतो, असा इशारा ग्रामस्थांनी दिल्यानंतर ताडोबा व्यवस्थापनाने तसा प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे पाठवला. त्यापाठोपाठ प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) यांनी ताडोबा प्रशासनाला तसे आदेश दिले.

**सूत्र** – 'ताडोबातील शिकारी वाघाचा गोरेवाड्यात संशयास्पद मृत्यू', https://www.lokmat.com, २३.०६.२०२०.
रवींद्र जुनारकर, 'चंद्रपूर : पाच ग्रामस्थांचा जीव घेणारा वाघ अखेर जेरबंद', https://www.loksatta.com, १०.०६.२०२०.
'पाच ग्रामस्थांचे बळी घेणाऱ्या वाघाला जेरबंद करण्याचे आदेश', https://www.loksatta.com, १०.०६.२०२०.
'ताडोब्यात व्याघ्रहल्ल्यात महिला ठार', https://maharashtratimes.indiatimes.com, २०.०५.२०२०.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ११५ वाघ व १५१ बिबटे



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा आणि बफर क्षेत्रात मिळून ११५ वाघ व १५१ बिबटे असावेत, असा प्राथमिक अंदाज महाराष्ट्र वन विभाग व भारतीय वन्यजीव संस्थे (Wildlife Institute of India) ने संयुक्तपणे जाहीर केलेल्या अहवालात व्यक्त केला आहे.

भारतीय वन्यजीव संस्था आणि वन विभागाने नोव्हेंबर २०१८ ते एप्रिल २०१९ या कालावधीत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघ, बिबट्यांची गणना केली. व्याघ्र गणनेत बिबट्यांची गणना करण्याची ही पहिली वेळ आहे.

अहवालानुसार वाघांची संख्या २०१८ मधील ८१ वरून २०१९ मध्ये ८८ पर्यंत वाढली. २०१८ आणि २०१९ च्या तुलनेत यंदा वाघांची संख्या ११५ वर पोहोचली आहे. बिबट्यांची संख्या १५१ इतकी आहे.

या गणनेसाठी एकूण ३५९ कॅमेरा ट्रॅप लावण्यात आले होते. तसेच गणनेसाठी सर्वेक्षणाच्या ट्रान्सेक्ट पद्धतीचाही अवलंब करण्यात आला.

**सूत्र** – 'ताडोबा व्याघ्र प्रकल्पात ११५ वाघ आणि १५१ बिबटे', https://www.loksatta.com, २०.०५.२०२०.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील एन-१ वाघीण जेरबंद

गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव व तिरोडा वन परिक्षेत्रांत एप्रिल महिन्यात दोघांना ठार करणाऱ्या एन-१ नावाच्या वाघिणीला सात मे रोजी बागडबंद गावाजवळ गुमडोह तलाव परिसरात जेरबंद करण्यात आले. तिची रवानगी गोरेवाडा प्राणिसंग्रहालयाकडे करण्यात आली.

एन-१ वाघिणीला पकडण्यासाठी ब्रम्हपुरीपासूनच प्रयत्न सुरू होते. ही वाघीण जवळपास तीन वर्षांची असून ती ब्रह्मपुरी वन विभागातून नवेगाव अभयारण्यात व तिथून नागझिरा अभयारण्याकडे आली. पुढे ती नागझिऱ्याच्या बफर क्षेत्रात वावरू लागली.

ब्रह्मपुरी वन विभागात या वाघिणीने तीन व्यक्तींना ठार केले. नागझिऱ्याच्या बफर क्षेत्रातील धानुटोला इथे तिने एका पुरुषाला ठार केले. त्यानंतर २० दिवसांनी नागझिरा अभयारण्याच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या मंगेझरी गावानजीक बफर क्षेत्रात एका महिलेला ठार केले. त्यामुळे या वाघिणीला जेरबंद करण्याचे आदेश वन विभागाने दिले होते.



**सूत्र** – 'अखेर ती वाघीण जेरबंद', www.tarunbharat.net, ०८.०५.२०२०.

## नांदुरमधमेश्वर अभयारण्य

### नांदुरमधमेश्वर अभयारण्याचा 'रामसर' दर्जा टिकविण्याचे आव्हान

नांदुरमधमेश्वर अभयारण्याचा 'रामसर' दर्जा टिकवून ठेवण्यासाठी वन विभागासमोर स्थानिक व प्रशासकीय अडथळे ओलांडण्याचे आव्हान आहे.



अभयारण्याच्या सीमारेषा आखलेल्या नसल्यामुळे अभयारण्यालगत असलेल्या चापडगावसह अन्य ११ गावांतील शेतकरी अभयारण्यातील धरणालगत असलेल्या जमिनीवर हक्क सांगत आहेत; त्यात राजकीय दबावही आहे. पाणथळीत मासेमारी करण्यासाठी लोक येतात. वेगवेगळ्या कारणांनी अभयारण्यात शिरणाऱ्या स्थानिकांची संख्या मोठी आहे. त्यांच्यासाठी प्रवेशपत्र असले तरी याचा गैरफायदा काहीजण घेतात. वन विभाग संशयितांवर कारवाई करते. मात्र, अपुऱ्या मनुष्यबळामुळे सर्वच हालचालींवर लक्ष ठेवणे अशक्य होत असल्याने कारवाईदरम्यान पुराव्याअभावी वाद उद्भवतात.

अभयारण्य परिसरातील धरणाला गोदावरीचे पाणी मिळते. नाशिक महानगरपालिका हद्दीतून या ठिकाणी दूषित पाणी येत असल्याने पक्षी, मासे यांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे. याबाबत नाशिक महानगरपालिका आणि पाटबंधारे विभाग यांच्याशी वन विभागाची चर्चा सुरू आहे.

अडचणी व त्यावर उपाय यांचा कृती आराखडा तयार करण्याचे काम सुरू असले तरी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे कामाचा वेग मंदावला आहे. पर्यटक येत नसल्याने महसुलात घट झाली आहे. केंद्रीय विभागाकडून आवश्यक निधी न मिळाल्यामुळेही कामे खोळंबली आहेत.

**सूत्र** – ''रामसर' दर्जा टिकवण्याचे नांदुरमध्यमेश्वर अभयारण्यासमोर आव्हान', https://www.loksatta.com, ०५.०६.२०२०.

### नांदुरमधमेश्वर अभयारण्यातील नदीपात्रात मृत मासे

नांदुरमधमेश्वर अभयारण्याचा भाग असलेल्या गोदावरी नदीच्या करंजगाव ते मांजरगाव टप्प्यात एप्रिल अखेरीस मोठ्या संख्येने मृत मासे आढळले.

गंगापूर धरणातून अहमदनगरसाठी पाणी सोडल्यामुळे गोदावरी नदी प्रवाहित झाली. तेव्हा तिच्या पात्रातून नांदुरमधमेश्वर धरणात काळे पाणी व पाणवेली वाहून आल्या. दूषित पाण्यामुळे गोदाकाठावरील करंजगाव, कोठुरे, मांजरगाव या गावांमध्ये नदीपात्रात मोठ्या संख्येने मासे मृत झाल्याचे दिसून आले. दूषित पाण्यामुळे पक्ष्यांच्या अधिवासालाही धोका पोहोचू शकतो, त्यामुळे या घटनेची चौकशी करण्याची मागणी पक्षीमित्रांनी केली आहे.

गोदावरीच्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी प्रदूषण मंडळाकडे पाठवले आहेत, असे नांदुरमधमेश्वर वन्यजीव क्षेत्राच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

**सूत्र** – 'नांदुरमधमेश्वर अभयारण्यात मृत मासे', https://www.lokmat.com, २०.०४.२०२०.

## बोर व्याघ्र प्रकल्प

### बोर व्याघ्र प्रकल्पात तपकिरी रंगाचे अस्वल

बोर व्याघ्र प्रकल्पात १४ मार्च रोजी अस्वलाचे तपकिरी रंगाचे पिल्लू कॅमेरा ट्रॅपमध्ये दिसून आले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या

सिपना वन्यजीव विभागात अवघ्या १० दिवसांपूर्वी – ४ मार्च रोजी तपकिरी रंगाचे मादी अस्वल कॅमेरा ट्रॅपमध्ये दिसून आले होते.

या पूर्वी २०१४ मध्ये मेळघाटात चिखलदरा वन परिक्षेत्रात तपकिरी रंगाचे अस्वल वनकर्मचाऱ्यांना दिसले होते. त्याची नोंद मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे आहे. त्यामुळे बोर अभयारण्यात आढळलेले हे पिल्लू ही विदर्भातील तपकिरी अस्वलाची तिसरी नोंद ठरली आहे.

**सूत्र** – अनिल कडू, 'बोर व्याघ्र अभयारण्यातही आढळले तपकिरी अस्वलीचे पिल्लू', https://www.lokmat.com, १९.०४.२०२०.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पात कॅमेरा ट्रॅपमुळे शिकाऱ्यांना पकडण्यात वन विभागाला यश

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात लावलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये शिकाऱ्यांच्या हालचालींची नोंद झाली व त्या आधारे सहा शिकाऱ्यांना पकडण्यात प्रकल्प प्रशासनाला यश आले.
व्याघ्रगणनेच्या कामाचा भाग म्हणून मेळघाटात लावलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये काही शिकारी हातात कुऱ्हाडी घेऊन, शिकारी कुत्र्यांसह वन्यप्राण्यांचा पाठलाग करताना दिसून आले. चिखलदरा भागातील सलोना गावाचे हे रहिवासी असल्याचे प्रकल्प प्रशासनाने शोधून काढल्यावर त्यांना अटक करण्यात आली.
मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अतिसंवेदनशील मानल्या गेलेल्या घटांग भागात हे शिकारी शिरले होते. २०१३ मध्ये बहेलिया समूहातील शिकाऱ्यांच्या संघटित टोळीने याच भागात एका अस्वलासह, वाघ, बिबट्यांची शिकार केली होती. त्यातील काही शिकाऱ्यांना पकडून शिक्षा ठोठावण्यात आली. मात्र, काही आरोपी अद्यापही फरार आहेत.

**सूत्र** - 'कॅमेरा ट्रॅप्स 'कॅच' पोचर्स इन मेळघाट', www.timesofindia.indiatimes.com, ०१.०७.२०२०.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पात टाळेबंदीत वन्यप्राण्यांचा मुक्त संचार; हरणांचा मृत्यू

टाळेबंदीच्या काळात पर्यटकांचा वावर नसल्यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वन्यप्राणी मुक्त संचार करताना दिसून आले. गाविलगड वन परिक्षेत्रात कॅमेरा ट्रॅपमध्ये वाघीण दोन बछड्यांसह वावरताना दिसली.

सेमाडोह, हरिसाल, कोलकाज, चिखलदरा, आमझरी, शहानूर, धारगड, अंबाबरवा, वान, नरनाळा, ढाकणा, चौरकुंड, हतरू, तारूबांदा, रायपूर परिसरात पर्यटकांसह गावकऱ्यांच्या वाहनांच्या रहदारीमुळे एरवी वन्यप्राणी रस्त्यांवर येत नसत.

मेळघाटच्या पायथ्याशी पथ्रोट परिसरातील शेतशिवारातही वन्यप्राण्यांचा वावर वाढलेला दिसून आला. जठाणपूर शिवारात कुत्र्यांनी हरणावर हल्ला केला. दुसरी घटना सोमठाणा शिवारात घडली; काळविटाचा कुत्र्याने केलेल्या हल्ल्यात मृत्यू झाला. अन्य घटनेत विहिरीत हरीण पडले; तर कासमपूर इथे गुराख्यांना हरणाचे नवजात पाडस मिळाले.

**सूत्र** – 'पथ्रोट परिसरात वन्य प्राण्यांचा मुक्त संचार', www.tarunbharat.net, १३.०५.२०२०.
'लॉकडाऊनमध्ये मेळघाटात वन्यप्राण्यांचा मुक्त संचार', https://www.lokmat.com, ११.०४.२०२०.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पात एका रात्रीत १७ हजारांहून अधिक प्राण्यांचे दर्शन

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात बुद्ध पौर्णिमेच्या रात्री वन विभागाने केवळ वनकर्मचाऱ्यांच्या सहाय्याने केलेल्या प्राणिगणनेत १७,१८६ प्राणी दिसून आले. टाळेबंदी लागू असल्याने वन्यप्राणीप्रेमींना प्राणिगणनेच्या उपक्रमात वन विभागाने सहभागी करून घेतले नाही.

प्रकल्पातील चार वन्यजीव विभागांतर्गत येणारी १८ वन परिक्षेत्रे आणि अकोला व पांढरकवडा भागातील सहा अभयारण्यांमध्ये ही प्राणिगणना करण्यात आली. या वेळी ५४६ मचाणांवरून निरीक्षण करण्यात आले. त्यात ३५ वाघ (tiger), ४० बिबटे (leopard), ३४० अस्वले (bear), ७५२ गवे (gaur), १७२ रानकुत्रे (wild dog) यांच्यासह सांबर (sambar) , चितळ (spotted deer), भेकर (barking deer), चौसिंगा, रानडुक्करे (wild boar), साळ (porcupine), तरस (hyena), नीलगाई, खवलेमांजर (pangolin) , कोल्हे (fox/jackal), ससे (hare), मुंगूस, जंगली मांजरे (wild cat), रानकोंबड्या (jungle fowl) , मोर (peacock) , वानरे (monkey) असे एकूण १७,१८६ प्राणीपक्षी दिसून आले.

**सूत्र** – विजय शिंदे, 'सुखद... मेळघाटात १७ हजार १८६ प्राण्यांचे दर्शन', https://www.lokmat.com, १०.०५.२०२०.



**टाळेबंदीत ४० वनाधिकारी, कर्मचाऱ्यांचे मेळघाट व्याघ्र प्रकल्पात सहभोजन!**

टाळेबंदी असताना मेळघाट प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रात सुमारे ४० अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समारंभ केला. या भागातील आमदारांनी जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडे याची तक्रार केली. मात्र, अवघ्या काही तासांतच ती मागेही घेतली.

चिखलदरा तालुक्यात रायपूर – सेमाडोह मार्गावर रायपूरजवळ वन खात्याची कारागोलाई व्याघ्र संरक्षण कुटी आहे. तिथे एक मे रोजी सकाळी सिपना वन्यजीव विभागाच्या उपवनसंरक्षकांसह इतर विभागाचे काही अधिकारी, कर्मचारी जल्लोष करत असल्याची तक्रार मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांनी अमरावती जिल्ह्याच्या पालकमंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांच्याकडे एका पत्रान्वये केली. एक अधिकारी प्रतिनियुक्तीवर इतर विभागात जात असल्याने हा निरोप समारंभ केल्याचे तक्रारीत म्हटले होते. मात्र, काही तासांनी पटेल यांनी हे पत्र मागे घेतले. काही राजकीय विरोधकांनी खोटी माहिती पुरवून माझी दिशाभूल केली, माझ्यात व वनाधिकाऱ्यांत वैमनस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला, अशा आशयाचे पत्र त्यांनी पालकमंत्र्यांना लिहिले.

दुसरीकडे, सिपना वन्यजीव विभागानेही झाल्या प्रकाराबाबत, वणव्याचा ऋतू असल्याने सेमाडोह ते रायपूर वनक्षेत्रात सामूहिक पायदळ गस्त घालण्यात आली आणि या गस्तीदरम्यान, दुपारच्या वेळी सर्व एकत्र जेवले, असा खुलासा केला.

आमदारांच्या स्पष्टीकरणासह हा खुलासाही ग्राह्य धरला तरी काही प्रश्न या वृत्तात उपस्थित केले आहेत, जसे की वन्यजीव विभागाच्या गस्तीत प्रादेशिक विभागाचे उपवनसंरक्षक का उपस्थित राहिले? टाळेबंदीत वन खात्यातील दोन विभाग मिळून एकदम २५-३० जण गस्तीसाठी का एकत्र आले?

**सूत्र** – 'बैठकीच्या नावावर मेळघाटच्या जंगलात वनखात्याची पार्टी!' https://www.loksatta.com, ०३.०५.२०२०.

**मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासनाच्या टाळेबंदीतील उपाययोजना इतरांसाठी मार्गदर्शक**

वन्यप्राण्यांच्या अधिवासाला कोरोना विषाणूची झळ पोहोचू नये म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने विविध स्तरांवर केलेल्या उपाययोजना इतर व्याघ्र प्रकल्पांसाठी मार्गदर्शक ठरणाऱ्या आहेत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या अकोट, गुगामल, सिपना, मेळघाट, अकोला, पांढरकवडा या वन्यजीव विभागांसह अमरावती इथल्या अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मास्क, सॅनिटायझर व साबण वाटप करण्यात आले. तसेच, क्षेत्रीय कर्मचाऱ्यांसाठी सेमाडोह, हरिसाल व ढाकणा येथे वैद्यकीय तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.

वन विभागाने उपलब्ध करून दिलेले कापड वापरून हरिसाल व आमझरी इथल्या महिला शिलाई केंद्राने सुमारे ११ हजार मास्क तयार केले. त्यांची खरेदी व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने केली व गावकऱ्यांना ते मोफत वाटले. प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या २१३ गावांमध्ये स्थानिक भाषेतून जनजागृती अभियान राबवण्यात आले. सुमारे ५० गावांमध्ये मास्क व साबण वाटप करण्यात आले. या गावांमध्ये विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने किराणा वाटप करण्यात आले. घरगुती गॅस संपल्यावर सरपणासाठी गावकऱ्यांनी जंगलात जाऊ नये म्हणून सुमारे १५४ कुटुंबांना मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठानमार्फत घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा करण्यात आला. पर्यटक मार्गदर्शकांची उपासमार होऊ नये म्हणून १३० पर्यटक मार्गदर्शकांना एक महिन्याचे किराणा वाटप करण्यात आले. दुर्गम भागातील १६२ संरक्षण कुटी व तपासणी नाक्यावरील स्थानिक रोजंदारी मजुरांना किराणा वाटप करण्यात आले.

**सूत्र** – 'करोनाच्या लढाईत मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची तयारी अव्वल', https://www.loksatta.com, २३.०४.२०२०.

**मेळघाट व्याघ्र प्रकल्पात महाशीर माशाचे उत्पादन**

नागपूर इथल्या महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या सहकार्याने मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील हिराबंबई इथल्या जलाशयात महाशीर माशाचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली आहे.

महाशीरचे मेळघाटात पैदास व संगोपन करण्याची योजना २०१४ मध्ये मंजूर करण्यात आली होती. २०१५ मध्ये पुणे जिल्ह्यातील लोणावळा तालुक्यातील वाळवण इथल्या टाटा महाशीर हॅचरीतून बीज आणून ते हिराबंबई इथल्या जलाशयात टाकण्यात आले. त्यातून २०१८ मध्ये नर व मादी वेगळे करून ३,००० महाशीर बोटुकलीचे उत्पादन घेण्यात आले, २०१९ या वर्षात ७,००० महाशीर बोटुकलीचे उत्पादन घेण्यात आले.

आधुनिक शेतीत वापरले जाणारी कीटकनाशके मोठ्या प्रमाणात नदीमध्ये वाहून येतात. कीटक व सूक्ष्म सजीवांवर गुजराण करणाऱ्या महाशीरचे खाद्य यामुळे नष्ट होत असल्याने महाशीर लुप्त होत चालला आहे.

**सूत्र** – 'दुर्मीळ महाशीर माशांचे मेळघाटात उत्पादन सुरू', www.tarunbharat.net, २०.०४.२०२०.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पांढरे अस्वल


'लाँग-टर्म मॉनिटरींग ऑफ टायगर बेअरिंग एरियाज् ऑफ विदर्भ' नामक उपक्रमाच्या चौथ्या टप्प्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पांढऱ्या मादी अस्वलाच्या अस्तित्त्वाची नोंद झाली आहे. यापूर्वी २०१४ मध्ये चिखलदराच्या जंगलात पांढरे अस्वल आढळले होते.

मेळघाटातील सिपना वन्यजीव विभागात लावलेल्या कॅमेरा ट्रॅपमध्ये ४ मार्च रोजी पहाटे पांढऱ्या मादी अस्वलाचे छायाचित्र टिपले गेले.

**सूत्र** – 'तब्बल सहा वर्षांनंतर पांढऱ्या अस्वलीचे दर्शन; मेळघाटच्या वैभवात वाढ', www.tarunbharat.net, १९.०४.२०२०.

### मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील वाघाचा मध्य प्रदेशाच्या हद्दीत मृत्यू; घटनास्थळी लागलेल्या आगीमुळे प्रकरणाला गंभीर वळण

बुलडाणा जिल्ह्यातील आंबाबरवालगत असलेल्या मध्य प्रदेशातील खकनार परिक्षेत्राच्या जंगलात एका वाघाचा कुजलेला मृतदेह आढळला. मृत वाघ मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील असून टी-२३ नावाने ओळखला जात होता. मात्र, अधिक तपासाकरिता प्रकल्पातील अधिकारी मध्य प्रदेशात घटनास्थळी पोहोचण्यापूर्वीच जंगलाला आग लागली व त्यात वाघाचा मृतदेह जळून खाक झाला.



मृत वाघाच्या शरीरातील कोणते अवयव किंवा कातडी शिल्लक होती व काय जळाले, या बाबतीत संभ्रम आहे. राखेत मिळालेले मृत वाघाचे काही अवशेष मध्य प्रदेश वन विभागाने फॉरेन्सिक विश्लेषणासाठी देहरादूनला पाठविले आहेत. कोरोना विषाणूचा संसर्ग या वाघाला पाळीव प्राण्यांमार्फत होण्याची शक्यता लक्षात घेता टी-२३ च्या शवविच्छेदनात कोरोनाच्या लक्षणाचे विश्लेषण आवश्यक मानले जात आहे.

या घटनाक्रमामुळे अनेक शंका उपस्थित झाल्या आहेत; वनाधिकाऱ्यांचे पथक येण्यापूर्वी नेमकी घटनास्थळी आग कशी लागली? कोरोना विषाणूच्या बाधेची शक्यता, मृतदेहातील अवयवांविषयी नेमक्या माहितीचा अभाव इत्यादी.

घटनास्थळ मध्य प्रदेशाच्या हद्दीत असल्याने चौकशीत अडथळे निर्माण झाले आहेत. मध्य प्रदेशाची सीमा धारणी व संग्रामपूर तालुक्याला लागून असल्याने मेळघाटच्या जंगलातून मोहफुले, सालई डिंक आणि वन्यप्राण्यांच्या अवयवांची तस्करी इथे नेहमी होत असते. टाळेबंदीच्या काळात जंगलात मानवी हस्तक्षेप कमी झाल्यामुळे वन्यप्राणी मध्य प्रदेशातील जंगलात प्रवेश करत असल्याचे दिसून आले होते.

**सूत्र** – 'वन्य प्राण्यांच्या सुरक्षेसाठी रॅपिड ॲक्शन फोर्स', www.tarunbharat.net, १४.०४.२०२०.
'वनातील आगीत वाघाचा मृतदेहही जळाला', www.tarunbharat.net, १३.०४.२०२०.
'मेळघाटच्या वाघाचा मध्यप्रदेशच्या जंगलात मृत्यू', www.tarunbharat.net, १२.०४.२०२०.

## यावल अभयारण्य

### यावल अभयारण्यात शिकाऱ्यांचा वनकर्मचाऱ्यांवर गोळीबार

यावल अभयारण्यातील लंगडा आंबा परिसरात शिरलेल्या २५-३० शिकाऱ्यांच्या टोळीने वन विभागाच्या कर्मचाऱ्यांवर गोळीबार केला.


मध्य प्रदेशातून लंगडा आंबा भागात शिकारी आले असल्याची माहिती वनाधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यामुळे वनरक्षकांसह १४ जणांच्या पथकाने त्या भागात जाऊन तिथे आलेल्या लोकांना हटकले. त्यावर त्यांनी आपण "वन जमिनी तयार करण्या"साठी आल्याचे सांगितले. तेव्हा वनकर्मचाऱ्यांनी अशा प्रकारे वन जमिनीवर अतिक्रमण करणे बेकायदा असल्याकडे त्यांचे लक्ष वेधले. त्याच वेळी या लोकांकडे शस्त्रे असल्याचे उघड होताच त्यांनी वनकर्मचाऱ्यांवर गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल वनकर्मचाऱ्यांनी हवेत गोळीबार केला, तेव्हा ही टोळी नदीमार्गे पळाली.

**सूत्र** – 'यावल अभयारण्यात शिकाऱ्यांचा वन विभागाच्या अधिकाऱ्यांवर गोळीबार', https://www.lokmat.com, ०५.०५.२०२०.



## लोणार अभयारण्य

### लोणार अभयारण्यातील सरोवराच्या पाण्याला लाल रंग; कारणमीमांसेसाठी पाण्याची तपासणी



बुलडाणा जिल्ह्यातील लोणार अभयारण्यातील सरोवराचे पाणी ९ जून रोजी लाल रंगाचे झाले. याची कारणमीमांसा करण्यासाठी त्या पाण्याचे नमुने तपासणीसाठी नागपूर इथल्या राष्ट्रीय पर्यावरण व अभियांत्रिकी संशोधन संस्था (नीरी) आणि पुणे इथल्या आगरकर संशोधन संस्थेकडे पाठविण्यात आले आहेत. राज्याचे वनमंत्री संजय राठोड यांनी ही माहिती दिली.

लोणार सरोवर हे उल्कापाताने तयार झालेले सरोवर असून यात क्षारांचे प्रमाण जास्त आहे. सरोवरातील पाण्यात विशिष्ट प्रकारचे सूक्ष्म जीव व शेवाळाच्या संयोगातून पाण्याला लाल रंग आला असावा, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. इराणमधील क्षारयुक्त सरोवरामध्ये अशा प्रकारे रंगात बदल झाल्याच्या घटना या पूर्वी झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर चौकशी करण्यात येत असून, अन्य कुठल्याही कृत्रिम घटकामुळे पाण्याचा रंग बदललेला नाही, असे राठोड यांनी सांगितले.

दुसरीकडे, 'बीटा कॅरोटीन' या रंगद्रव्यामुळे लोणार सरोवरातील पाण्याचा रंग बदलला असावा, असा प्राथमिक अंदाज 'जिओलॉजीस्ट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र' या संस्थेने व्यक्त केला. संस्थेच्या चमूनेही लोणार सरोवराला भेट देऊन तपासणीसाठी पाणी व मातीचे नमुने घेतले आहेत. भूजलाची तपासणी करण्यासाठी परिसरातील विहिरी व विंधन विहिरींचे सर्वेक्षणही केले.

**सूत्र** – नितीन पखाले, 'लोणार सरोवरातील पाण्याच्या रंग बदलाचे संशोधन : वनमंत्री संजय राठोड',
https://www.loksatta.com, १२.०६.२०२०.
''बीटा कॅरोटीन' द्रव्यामुळे लोणार सरोवरातील पाण्याच्या रंगात बदल, 'जिओलॉजिस्ट'चा अंदाज'.
https://www.loksatta.com, १३.०६.२०२०.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात शिकाऱ्यांना वन विभागाच्या कुत्र्याची दहशत

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पात जर्मन शेफर्ड प्रकारचा रितू नामक कुत्रा शिकाऱ्यांना पकडून देणे, पुरावे मिळवून देणे, वनरक्षकांना गस्तीसाठी मदत करणे अशी कामे करत आहे.

काही दिवसांपूर्वी पाटणजवळ ग्रामस्थांनी रानडुकराची शिकार केली. या प्रकरणात रितूने डुकराचे जमिनीखाली पुरलेले मांस शोधून आरोपींचाही माग काढला. त्यामुळे सहा जणांना अटक करण्यात आली. त्यापूर्वी एका मृत बिबट्यावरून रितू आरोपींपर्यंत पोहोचला होता. खवलेमांजर, साळींदर यांच्या शिकारींची उकलही रितूने केली आहे.

व्याघ्र प्रकल्पातील शिकारींना आळा घालण्यासाठी श्वानपथक तयार करण्याची योजना वन विभागाने इथे राबवली. साधारण चार वर्षांपूर्वी 'रितू' नामक कुत्रा या योजनेचा भाग झाला. रितूने अनेक महत्त्वाच्या प्रकरणांचे धागेदोरे शोधून आरोपींना पकडण्यास वन विभागाला मदत केली आहे.

परिसरातील ग्रामस्थांना रितू शिकारी शोधून काढू शकतो याची जाणीव झाल्यामुळे शिकारीचे प्रमाण कमी झाले आहे, असे सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांचे मत आहे.



**सूत्र** – 'व्याघ्र प्रकल्प रक्षणात 'जर्मन शेफर्ड'ची कामगिरी',
https://www.loksatta.com, ०३.०५.२०२०.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प/राधानगरी अभयारण्य

### सह्याद्रीच्या संवेदनशील क्षेत्रातून गावे न वगळण्याची सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाधिकाऱ्यांची विनंती

सह्याद्रीच्या पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्रातून गावे वगळणे वन्यजीवांवर दूरगामी दुष्परिणाम घडवणारे असेल, त्यामुळे गावे वगळू नयेत, अशी विनंती वन्यजीव विभागाच्या वतीने सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री कार्यालयाला केली आहे.

महाराष्ट्र शासनाने सह्याद्रीच्या संवेदनशील क्षेत्रातून

३८८ गावे वगळण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवला. त्यामध्ये सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, तसेच राधानगरी अभयारण्याच्या गाभा व बफर क्षेत्रांतील आणि त्याचबरोबर राधानगरी अभयारण्य ते तिलारी दरम्यान असलेल्या वन्यजीवांच्या संचारमार्गातील जवळपास २७ गावांचा समावेश आहे. मात्र, या गावपरिसराची पर्यावरणीय वैशिष्ट्ये व त्यावर वाघ, हत्तीसह इतर वन्यजीवांचे असलेले प्रचंड अवलंबित्व लक्षात घेता ही गावे वगळू नयेत, असे वन्यजीव विभागाचे म्हणणे आहे.

सह्याद्रीतील जवळपास ७० टक्के क्षेत्राचे व्यवस्थापन ज्या वन्यजीव विभागाच्या अखत्यारित येते, त्या विभागाशी सल्लामसलत न करता गावे वगळण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, अशी टीका होत आहे.

**सूत्र** – संदीप आडनाईक, 'सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्ह्यातील २७ गावे न वगळण्याची विनंती', https://www.lokmat.com, २६.०५.२०२०.
'सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी जिल्ह्यांतील 'ही' गावे वगळू नका; कोणी केली सरकारला मागणी पर्यावरणप्रेमींनी नक्की वाचा', https://www.esakal.com, ०१.०६.२०२०.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील बेकायदा वृक्षतोड व अतिक्रमणावर कारवाई

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात साई बांगोडा इथे टाळेबंदीच्या काळात झालेली अवैध वृक्षतोड आणि अतिक्रमणावर दोन महिन्यानंतर कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान सुमारे पाच हेक्टर जागेवरील सात कुंपणे आणि शेतीसाठी बांधलेले पाच तात्पुरते आडोसे हटवण्यात आले.

वृक्षतोड आणि अतिक्रमण होण्यापूर्वी याच ठिकाणी गस्तीवर असलेल्या वनकर्मचाऱ्यास मारहाण करून पकडून ठेवण्यात आले होते. त्यामुळे अतिक्रमण हटवण्यासाठी पोलीस संरक्षणाची आवश्यकता होती. मात्र पोलीस टाळेबंदीच्या अंमलबजावणीत व्यस्त असल्याने ही कारवाई लांबली. गेल्या काही दिवसांत टाळेबंदीतील ताण कमी झाल्यानंतर पोलीस व राज्य राखीव पोलीस दलाच्या बंदोबस्तात वन विभागाने ही कारवाई केली.

**सूत्र** – 'संजय गांधी उद्यानातील अतिक्रमणावर अखेर कारवाई', https://www.loksatta.com, ०८.०६.२०२०.

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या येऊर, तुंगारेश्वर भागांवर ड्रोनची नजर

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील येऊर व तुंगारेश्वर वन परिक्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्याचा निर्णय वनाधिकाऱ्यांनी घेतला आहे.



येऊरच्या जंगलात अनधिकृत बांधकामे सातत्याने उभी राहात आहेत. वन्यप्राण्यांच्या शिकारीही झालेल्या आहेत. मात्र, जंगलाचा परिसर मोठा असल्यामुळे वनकर्मचाऱ्यांना या भागात लक्ष ठेवताना मर्यादा येतात. त्यामुळे अनेकदा कारवाई करण्यापूर्वीच आरोपी फरार होतात. टाळेबंदीच्या काळातही समाजकंटकांचा या जंगलात बेकायदा वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. काही दिवसांपूर्वीच जंगलात वणवे लावण्यात आल्याचे, दारूभट्ट्या सुरू करण्यात आल्याचे आणि काही भागांत अतिक्रमण झाल्याचेही समोर आले. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी ड्रोन वापराचा निर्णय घेण्यात आला आहे.

**सूत्र** – 'येऊरच्या जंगलात आता 'ड्रोन'द्वारे टेहळणी', https://www.loksatta.com, १३.०५.२०२०.

## ज्ञानगंगा अभयारण्य

### 'टी१सी१' वाघ ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावला

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातून आलेला 'टी१सी१' वाघ बुलडाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावला आहे. या वाघाने सुमारे तीन हजार किलोमीटरचा प्रवास केला. या काळात कोणत्याही ठिकाणी तो फार काळ स्थिरावला नाही. मात्र, अलीकडच्या काही महिन्यांत तो ज्ञानगंगा अभयारण्यात स्थिरावला आहे.

टी१सी१ची ही वाटचाल जोडीदाराच्या शोधात असल्याचे वनाधिकाऱ्यांचे म्हणणे होते. त्याचा ज्ञानगंगा अभयारण्यातील मुक्काम पाहता त्याच्यासाठी जोडीदार शोधावा का, यावर निर्णय घेण्यासाठी वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी तज्ज्ञांची समिती नेमली. या समितीच्या दोन बैठकाही झाल्या. २८ मार्चला ज्ञानगंगा अभयारण्यात अंतिम बैठकीत याबाबतचा निर्णय अपेक्षित होता. दरम्यान, कोरोना विषाणूच्या प्रसाराला आळा घालण्यासाठी टाळेबंदी जाहीर करण्यात आली. ती

संपेल या आशेवर दोनदा बैठकीची तारीख बदलण्यात आली. मात्र, टाळेबंदी वाढतच गेली. त्यामुळे अंतिम निर्णय होऊ शकला नाही.

**सूत्र** – ''त्या' वाघासाठी वाघिणीचा शोध थांबला',
https://www.loksatta.com, १९.०५.२०२०.

## राज्यस्तरीय बातम्या

### राज्यात आंतरजिल्हा प्रवासावर बंदी असताना वन्यजीव पर्यटनाला सुरुवात

वन्यजीव पर्यटनाला एक जुलैपासून सुरुवात झाली असली तरी महाराष्ट्रातील कोविड-१९ संदर्भातील टाळेबंदीची मुदत ३१ जुलैपर्यंत वाढविण्यात आली आहे, त्यामुळे इच्छुक पर्यटकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

महाराष्ट्रातील वन्यजीव पर्यटनाबाबत इच्छुक पर्यटकांनी, सेवा पुरवठादारांनी, प्रसोकल्पाधिकाऱ्यांनी आणि विविध जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना येणाऱ्या विविध अडचणी मांडल्या आहेत.

टाळेबंदीमुळे आंतरजिल्हा प्रवासावर बंदी आहे. ई-पास घेऊन आंतरजिल्हा प्रवासाची तरतूद उपलब्ध असली तरी ही सोय फक्त तातडीच्या वैद्यकिय सेवा, आरोग्यविषयक कारणांपुरती मर्यादित आहे. पर्यटनाचा पर्याय ई-पासवर उपलब्ध नाही. तसेच, ताडोबा अंधारीतील पर्यटनफेरीची नोंदणी ऑनलाइन करण्याची सुविधा सध्या बंद आहे. ही नोंदणी प्रवेशद्वारावर पोहोचून करावी लागणार आहे. त्यामुळे आगाऊ नोंदणी शक्य नाही व आंतरजिल्हा प्रवासाची व्यवस्था करण्यासाठी सरकारी यंत्रणांना दाखविण्यास कोणताही पुरावा इच्छुक पर्यटकांना मिळत नाही.

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पर्यटनासाठी लागू केलेल्या नियमांचे पालन करण्याकरता गरजेच्या व्यवस्था उभारल्या असल्या तरी ताडोबा प्रकल्पालगत असलेली राहण्याजेवण्याची ठिकाणे अद्याप बंद आहेत. त्यामुळे अनेक इच्छुकांनी पर्यटनाचा बेत रद्द केला आहे, या कडे सेवा पुरवठादारांनी लक्ष वेधले आहे.

जिल्हा प्रशासनाला टाळेबंदीबाबत स्थानिक पातळीवर नवी बंधने लागू करण्याची मुभा आहे, मात्र केंद्र, राज्य शासनाने लागू केलेल्या बंधनांतून सवलत देण्याची मुभा नसल्याचे चंद्रपूर, यवतमाळ जिल्हा प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

या सर्व अडचणींमुळे पर्यटन सुरू करून पर्यटक मार्गदर्शक, वाहनचालकांच्या उपजीविकेची सोय करण्याचा उद्देश तूर्तास यशस्वी होणे अवघड झाले आहे.

टिपेश्वर अभयारण्यात पर्यटनाला परवानगी मिळाल्यापासून – १९ जूनपासून अवघ्या पर्यटकांच्या अवघ्या दोन गटांनी भेट दिली आहे.

दरम्यान, पेंच व्याघ्र प्रकल्पातही पर्यटनाला सुरुवात झाली असून, या प्रकल्पाच्या मध्य प्रदेशातील गाभा क्षेत्रातील पर्यटन जिल्हा प्रशासन व वन्यजीव अधिकाऱ्यांमधील समन्वयामुळे सुरळित झाले आहे.

**सूत्र** – विजय पिंजरकर, 'बफर टुरिझम ओपन्स बट टूरिस्ट्स् काण्ट क्रॉस डिस्ट्रिक्ट बॉर्डर',
www.timesofindia.indiatimes.com, ०१.०७.२०२०.

### कोकणातील तिल्लारीच्या जंगलाला 'संवर्धन राखीव क्षेत्रा'चा दर्जा

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील तिल्लारीच्या जंगलाला 'संवर्धन राखीव क्षेत्र' (conservation reserve) म्हणून घोषित केले आहे. तिल्लारीचे जंगल कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी वन्यजीव अभयारण्याला कर्नाटकातील बेळगाव जिल्ह्यातील भीमगड वन्यजीव अभयारण्याशी जोडते. तिल्लारीच्या जंगलात वाघांसह हत्ती, बिबट, गवा, सांबर, चौसिंगा आदी प्राण्यांचा वावर आहे.

तिल्लारीची अधिसूचना काढताना राज्य शासनाने हे संवर्धन राखीव क्षेत्र वाघांच्या भ्रमणमार्गासाठी महत्त्वाचे ठरेल, अशी भूमिका मांडली. मात्र, वन्यप्राण्यांसाठी त्यांच्या गरजांनुसार किती क्षेत्रफळ आवश्यक आहे हे ठरलेले आहे. तेवढे क्षेत्रफळ व पाण्याची पुरेशी उपलब्धता असेल, तरच संवर्धनाचा उद्देश साध्य करता येतो. तिल्लारीतील प्रजननक्षम वाघ व हत्तींचा वावर पाहता हे संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करताना वन्यप्राण्यांसाठी वैज्ञानिकदृष्ट्या आवश्यक क्षेत्रफळाची गरज लक्षात घेणे आवश्यक होते. तिल्लारीच्या बाबतीत हा निकष लक्षात घेतलेला नाही. त्यामुळे संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या २९.५३ चौ. किमी क्षेत्रफळात केवळ बेडूक, साप यासारख्या प्राण्यांचेच संवर्धन होऊ शकते, वाघ, हत्ती अशा प्राण्यांसाठी अधिक क्षेत्रफळाची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

संवर्धन राखीव क्षेत्र, अभयारण्य, व्याघ्र प्रकल्पाची अधिसूचना काढताना त्याबाबतचा प्रस्ताव राज्य वन्यजीव मंडळ (State Board for Wildlife) च्या बैठकीत मांडावा

लागतो. त्या प्रस्तावावर तज्ञ सदस्यांची चर्चा होते व गरज भासल्यास क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी केली जाते.

पडताळणी झाल्यानंतर राज्य सरकार त्याबाबतची अधिसूचना काढते. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून राज्य वन्यजीव मंडळाची बैठक झालेली नाही. राज्यात नवे सरकार आल्यानंतरदेखील बैठक झाली नाही, या बाबीकडे दुर्लक्ष करत राज्य शासनाने परस्पर तिल्लारी संवर्धन राखीव क्षेत्राची अधिसूचना काढली आहे.

दरम्यान, तिल्लारीत पर्यटनाला चालना देण्यासाठी आवश्यक तयारी करण्याचे आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य शासनाच्या संबंधित विभागांना दिले आहेत.

**सूत्र** – राखी चव्हाण, 'वन्यजीव मंडळाला बगल देत तिल्लारीचे राखीव क्षेत्र जाहीर', https://www.loksatta.com, ३०.०६.२०२०.
'कोकण्ज् पिक्चरस्क तिल्लारी इज नाऊ कॉन्झर्वेशन रिजर्व', www.outlookindia.com, २५.०६.२०२०.

### दहा दिवसांत महाराष्ट्रात पाच वाघांचा मृत्यू

जूनच्या मध्यानंतर अवघ्या १० दिवसांत महाराष्ट्रात पाच वाघांचा मृत्यू झाला असून त्यापैकी चार मृत्यू अनैसर्गिक परिस्थितीत झाले आहेत. त्यामध्ये वाघीण व बछड्यांवरील विषप्रयोग, गोरेवाडा बचाव केंद्रात झालेला वाघाचा मृत्यू आणि औरंगाबादेत सिद्धार्थ उद्यान व प्राणिसंग्रहालयात झालेल्या वाघिणीच्या मृत्यूचा समावेश आहे. गडचिरोली जिल्ह्यात दोन वाघांमध्ये झालेल्या संघर्षात एका वाघाचा मृत्यू झाला.

जानेवारी २०२० पासून महाराष्ट्रात झालेल्या नऊ व्याघ्रमृत्यूंपैकी सहा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पासह आसपासच्या परिसरात झाले आहेत.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा (National Tiger Conservation Authority) ने अनैसर्गिक मृत्यूंबाबत केलेल्या चौकशीत वन विभागाकडून कामांच्या अंमलबजावणीत त्रुटी राहिल्याने हे मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात १० व १४ जून रोजी आढळलेल्या अनुक्रमे वाघीण व बछड्यांच्या मृत्यूचा तपास वन विभागाने पुरेशा गांभीर्याने केला नाही, वाघिणीच्या मृतदेहांपासून अवघ्या २०० मी अंतरावरील बछड्यांचे मृतदेह तीन दिवसांनी दिसले, हे पाहता एकूणच संरक्षणात वाढ करण्याची गरज आहे, असे मत प्राधिकरणाच्या तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील कोलारा परिसरातून पकडून गोरेवाडा बचाव केंद्रात ठेवलेल्या वाघाचा मृत्यू विशिष्ट जंतुसंसर्गामुळे झाल्याची शक्यता समोर आली आहे. मात्र, प्राधिकरणाच्या तपास अधिकाऱ्यांनी या शक्यतेची खातरजमा करण्याची गरज व्यक्त केली आहे. अशी खातरजमा करण्याआधीच वाघाला त्या जंतुसंसर्गासाठी औषधे दिल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. बचाव केंद्रातील अधिकाऱ्यांनी तो वाघ आक्रमक असल्यामुळे तपासणीसाठी त्याच्या रक्ताचा नमुना घेता आला नाही, असे कारण दिले. पकडल्यानंतर लागलीच रक्ताची तपासणी करून वाघाच्या प्रकृतीबाबत नोंद केली असती तर वाघाला संसर्ग कधी झाला, हे कळू शकले असते, अशी नोंद प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी या संदर्भातील चौकशीच्या अहवालात केली आहे.

दहा दिवसांत पाच वाघांचा मृत्यू ही चिंतेची बाब असल्याचे वन्यप्राणीप्रेमी व वन्यजीव संरक्षणविषयक काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी म्हटले आहे.

दरम्यान, वन विभागाने केलेल्या अंतर्गत चौकशीत एका व्याघ्रमृत्यू प्रकरणी विभागातील कर्मचारी दोषी आढळून आले असून त्यांच्यावर कारवाई केल्याचे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**सूत्र** – बद्री चॅटर्जी, 'फाइव्ह टायगर डेथ्स इन टेन डेज् इन स्टेट, एन.टी.सी.ए. रीवील्स लॅप्सेस्', www.hindustantimes.com, २५.०६.२०२०.

### समृद्धी द्रुतगती महामार्गावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी काही उपाययोजनांनाच मान्यता

नागपूर व मुंबई शहरांना जोडणाऱ्या समृद्धी द्रुतगती महामार्गावर वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी तज्ज्ञांच्या समितीने सुचवलेल्या काही उपाययोजनाच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने मान्य केल्या आहेत.

वन्यप्राण्यांच्या सुरक्षेसाठी उपाययोजनांकरिता तत्कालीन सरकारने राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) नितीन काकोडकर यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय समिती स्थापन केली होती.

७१० किमी लांबीच्या या महामार्गावर ११७ किमीच्या क्षेत्रात वन्यप्राण्यांचा अधिवास आहे. मार्गावर ३२ मीटर रुंदीचे व १२० मीटर लांबीचे उड्डाणमार्ग आहेत. महामार्गाची रुंदी ३६० फूट आहे. उड्डाणमार्गाची रुंदी ६० मीटर करण्याची सूचना समितीने केल्यावर त्यावर अतिरिक्त खर्चाचा मुद्दा उपस्थित करून महामंडळाने हरणांचा अधिवास असलेल्या ठिकाणच्या उड्डाणमार्गांचीच रुंदी वाढवण्याचे मान्य केले. ही रुंदी ४५ मीटर करण्यात येणार आहे.

या महामार्गाला बाहेरून २.४ मीटर आणि वर एक मीटर जाळी असणारी कुंपणासारखी भिंत असणार आहे. वन्यजीव अधिवास क्षेत्रात या भीतींची उंची चार मीटर करण्याची सूचना महामंडळाने मान्य केली.

तुळजापूर महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी खबरदारीच्या उपाययोजना करण्यात आल्या नाहीत. याच महामार्गाला समांतर जात असलेल्या समृद्धी महामार्गावर मात्र उपाययोजना केल्या जाणार आहेत.



**सूत्र** – 'समृद्धी महामार्गावर वन्यप्राण्यांना सुरक्षाकवच', https://www.loksatta.com, २५.०६.२०२०.

### दुर्मीळ सागरी प्राण्यांच्या संरक्षणासाठी नुकसानभरपाई योजना

पालघर, मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतून गेल्या दशकभरात २७ ऑलिव रिडले कासवे, १६ ग्रीन सी कासवे, १७ व्हेल शार्क, एक हॉक्सबिल कासव, एक इंडियन ओशन हम्पबॅक डॉल्फिन, एक लेदरबॅक समुद्री कासव आणि ११ जाएंट गिटारफिश यांचा जीव वाचवण्यात वन विभागाला यश आले.

वन खात्याच्या कांदळवन कक्षाने मत्स्यव्यवसाय विभागाच्या सहकार्याने मासेमारांसाठी नुकसानभरपाई योजना सुरू केली आहे. समुद्रात मासेमारी करताना अनेकदा संरक्षित व दुर्मीळ सागरी प्राणी चुकून मासेमारांच्या जाळ्यात अडकतात. अशा वेळी जाळे तोडले तरच हे प्राणी वाचू शकतात. जाळे कापून पुन्हा समुद्रात सोडताना नुकसान झालेल्या जाळ्यासाठी २५ हजार रुपयांपर्यंतचे अनुदान कांदळवन कक्षामार्फत दिले जाते.

शाश्वत मासेमारी आणि दुर्मीळ सागरी प्रजातींचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने वन विभागाने ही योजना आखली आहे. यासाठी सागरतटीय जिल्ह्यांमध्ये वन विभागाच्या वतीने जनजागृती कार्यशाळा घेण्यात आल्या. पालघर, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतून जवळपास ११०० मासेमार यात सहभागी झाले होते.

वन खात्याच्या आकडेवारीनुसार, आतापर्यंत ६४ प्रकरणांमध्ये ५९ मासेमारांना ११ लाख ९४ हजार ३५० रुपये नुकसानभरपाई म्हणून देण्यात आले.

**सागरी जीवांच्या बचावाच्या घटनांची जिल्हानिहाय आकडेवारी**


| जिल्हा | घटनांची संख्या |
|---|---|
| पालघर | ९ |
| ठाणे | २३ |
| मुंबई | १ |
| रायगड | १३ |
| रत्नागिरी | २ |
| सिंधुदुर्ग | १६ |
| एकूण | ६४ |

**सूत्र** – 'दुर्मीळ सागरी प्रजातींना जीवदान', https://www.loksatta.com, ०३.०६.२०२०.

### काळविटांच्या अधिवासाचा ऱ्हास

अधिवास आक्रसू लागल्याने काळवीटे (blackbuck) मानवी वस्तीत शिरून मृत्यूमुखी पडत आहेत. महाराष्ट्रात गेल्या वर्षभरात किमान १७५ काळविटांचा मृत्यू झाला.

काळविटांसाठी घोषित देऊळगाव-रेहेकुरी आणि कारंजा सोहोळ अभयारण्यांसह ममदापूर आणि येडशी रामलिंग इथेही काळविटांच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र, या संरक्षित क्षेत्रांव्यतिरिक्त राज्यात इतर क्षेत्रातही मोठ्या संख्येने काळवीटे आहेत. मात्र वन खात्याच्या अखत्यारित हे क्षेत्र येत नसल्यामुळे आणि वृक्षलागवड, अतिक्रमणांमुळे काळविटांचा हा अधिवास नाहीसा होत आहे.



नागपुरातील हुडकेश्वर परिरात दोनतीन वर्षांपूर्वी मोठ्या संख्येने काळविटांचे कळप दिसून आले होते. राष्ट्रीय महामार्ग जवळ असल्याने पाण्यासाठी महामार्ग ओलांडणाऱ्या अनेक काळविटांचा अपघातात मृत्यू झाला. काही दिवसांपूर्वी गोंदिया शहरात काळवीट शिरले होते. काही लोकांनी दुचाकीवरून त्याचा पाठलाग करत त्याला कित्येक किमी पळविले व अखेर भिंतीला धडकून त्याचा मृत्यू झाला.

गोंदियासह अमरावती, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यातील त्यांचा अधिवास नाहीसा झाल्यामुळे काळविटांनी

शेताचा आसरा घेतला आहे आणि शेतकऱ्यांनी त्यांना ठार मारण्याची परवानगी मागितली आहे.

**सूत्र** – 'काळविटांच्या अधिवासावर अतिक्रमण', https://www.loksatta.com, ३१.०५.२०२०.

### अस्वलाच्या हल्ल्याच्या दोन घटनांमध्ये एक ठार, दोन जखमी


रावेर भागात जंगलात लाकडे घेण्यासाठी गेलेली एक व्यक्ती अस्वलाच्या हल्ल्यात ठार झाली. मुक्ताई नगर तालुक्यातील कर्की गावाजवळील रामगड तांड्याजवळ ही दुर्घटना झाली.

नंदुरबार जिल्ह्यातील तळोदा तालुक्यातील मोहिदा इथे ऊसाच्या शेतात पाणी भरण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीवर अस्वलाने हल्ला केला व त्या पाठोपाठ समोरून येणाऱ्या ११ वर्षांच्या बालकावर अस्वलाने हल्ला केला. गावकऱ्यांनी पळत जाऊन आरडाओरड केल्याने हे दोघे अस्वलाच्या हल्ल्यातून बचावले.

**सूत्र** – 'अस्वलाच्या हल्ल्यात एक ठार', https://maharashtratimes.indiatimes.com, २२.०५.२०२०.

### चंद्रपूर शहरात अस्वलाची भटकंती

टाळेबंदीच्या काळात चंद्रपूर शहरात एका अस्वलाने तब्बल सात तास फेरफटका मारला.




चंद्रपूर वीज केंद्र परिसरातून रेल्वे रूळामार्गे शहरात मध्यरात्रीनंतर दोनच्या सुमारास एक मादी अस्वल शिरले. तिथून संजय गांधी मार्केट परिसर व पुढे जटपुरा गेटपर्यंत हे अस्वल गेले. पुढे अस्वलाने बस स्थानक, रेल्वे स्थानक, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, बंगाली कॉलनी परिसरात भटकंती केली. मग औद्योगिक वसाहतीमार्गे ते आदर्श पेट्रोल पंपालगत असलेल्या महावितरण केंद्राच्या परिसरात शिरले. त्यानंतर शास्त्रीनगरमार्गे राधिका सभागृहापर्यंत अस्वल पोहोचले तेव्हा दिवस उजाडला होता. अस्वलाने सीएचएल रूग्णालयालगत असलेल्या झाडीत आसरा घेतला. तेव्हा त्याच्या मागावर असलेल्या वनकर्मचाऱ्यांनी अस्वलाला बेशुद्ध करून त्याची उपचार केंद्रात रवानगी केली.

चंद्रपूर वीज केंद्राजवळ ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचा परिसर आहे. त्यामुळे वीज केंद्र परिसरात वाघ, अस्वलासह वन्यप्राण्यांचे दर्शन होते. खेरीज, रेल्वे रूळमार्गे वन्यप्राणी चंद्रपूर शहरात शिरतात.

**सूत्र**– 'अस्वलाचा चंद्रपूर शहरात तब्बल सात तास मुक्त संचार', https://www.lokmat.com, ०२.०५.२०२०.

### मालेगावात गिधाड दिसले



नामशेष होण्याच्या मार्गावर असलेले भारतातील लांब चोचीचे गिधाड (long-billed vulture) मालेगाव इथे आढळून आले. वत्सगुल्म जैवविविधता संवर्धन संस्थेने ही नोंद केली. मालेगाव तालुक्यात १९९० च्या दशकानंतर गिधाडे दिसेनाशी झाली होती.

**सूत्र** – 'मालेगावात आढळले दुर्मीळ लांब चोचीचे गिधाड', www.tarunbharat.net, ०२.०५.२०२०.

### साप व कासवाची तस्करी करणाऱ्यांना दोन पोलिसांची साथ

तस्करीच्या प्रयत्नात असलेल्या १९ संशयितांना वन विभागाच्या पथकाने ताब्यात घेतले. त्यामध्ये दोन पोलिसांचा समावेश आहे.

जूनच्या पहिल्या पंधरवड्यात येवल्यातून ताब्यात घेतलेल्या संशयितांच्या चौकशीदरम्यान वन विभागाला मांडूळ साप व कासव तस्करांच्या मोठ्या टोळीविषयी माहिती मिळाली होती. त्यामध्ये पोलीस कर्मचारीही सामील असल्याचा सुगावा वन विभागाला लागला होता. नाशिक पूर्व वन विभागाच्या पथकाने मिळालेल्या माहितीच्या आधारे कारवाई केली तेव्हा त्यांना तस्करांना सामील असलेले ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक व पुण्यातील पोलीस कर्मचारी सापडले.

**सूत्र** – नंदकुमार जोशी, ‘मांडूळ, कासवाची तस्करी; ठाण्यातील पोलीस अधिकाऱ्यासह १९ जणांना बेड्या’, https://maharashtratimes.indiatimes.com, १५.०६.२०२०.

### चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांच्या स्थलांतराबाबत चर्चा; स्थानिक वनाधिकारी अनभिज्ञ

चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांची वाढती संख्या लक्षात घेता जिल्ह्यातील ५० वाघांचे इतर जिल्ह्यांत स्थलांतर करण्याबाबत राज्याच्या वनमंत्र्यांच्या उपस्थितीत नागपुरात एका बैठकीत चर्चा झाली. प्रधान मुख्य वन संरक्षकांसह अन्य अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मात्र, चंद्रपूर जिल्ह्यातील वाघांना इतरत्र स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव चंद्रपूर वन विभागाने वरिष्ठांना पाठविलेला नाही. तसा विचार वरिष्ठ पातळीवर असेल, तर आम्हाला त्याबाबत कल्पना नाही, असे चंद्रपूर वन विभागाच्या मुख्य वनसरंक्षकांनी सांगितले. तसेच, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या उपसंचालकांनीही ताडोबातील कुठल्याही वाघाचे स्थलांतर करण्याचा विचार नसल्याचे सांगितले.

राज्यात एकूण ३१२ व त्यापैकी १६० वाघ एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात आहेत. चंद्रपूर शहरापासून केवळ पाच किलोमीटर त्रिज्येच्या वर्तुळात २१ वाघांचा संचार आहे. येत्या वर्षभरात या परिसरात आणखी ६० बछड्यांची भर पडणार आहे.

**सूत्र** – ‘चंद्रपूर येथील ५० वाघांचे लवकरच स्थानांतरण’, महासंवाद, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.
https://mahasamvad.in/?p=13226, २३.०५.२०२०.
‘वाघ स्थलांतरणाच्या हालचाली नाहीत’, www.tarunbharat.net, २४.०५.२०२०.

### कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर टाळेबंदीमुळे बुद्ध पौर्णिमेची लोकसहभागातून प्राणिगणना यंदा रद्द

दरवर्षी वैशाख महिन्यातील पौर्णिमा अर्थात बुद्धपौर्णिमेला करण्यात येणाऱ्या पाणवठ्यावरील प्राणिगणनेत लोकांना सहभागी करून घेण्याची वन विभागाची प्रथा आहे. मात्र, यंदा कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाला आळा घालण्यासाठी टाळेबंदी असल्यामुळे बुद्ध पौर्णिमेचा हा उपक्रम लोकांच्या सहभागाविनाच करण्याचा निर्णय वन विभागाने घेतला. संपूर्ण महाराष्ट्रात कुठेही असे कार्यक्रम घेतले जाऊ नयेत, अशा सूचना वन मुख्यालयाने दिल्या.

वैशाख महिन्यात वातावरण कोरडे असते आणि पौर्णिमेच्या रात्री सर्वाधिक चंद्रप्रकाश असतो. या काळात निवडक पाणवठ्यांना आणि ते ही कमी पाणी असल्याने अशा ठिकाणी सर्व प्रकारचे प्राणी मोठ्या संख्येने दिसण्याची शक्यता असते. त्यामुळे, प्राणिगणनेसाठी ही रात्र निश्चित केली आहे. प्राणिगणनेत सहभागी होण्यासाठी अनेक दूरवरच्या ठिकाणांवरून लोक जंगलात येतात. मात्र, यंदा असे अनेक लोकांनी एकत्र येणे धोक्याचे असल्याने सर्वच जंगलांमधील प्राणिगणनेचा कार्यक्रम स्थगित करण्यात आला.

परिणामी, काही संरक्षित क्षेत्रांमध्ये फक्त वनकर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत आणि काही संरक्षित क्षेत्रांमध्ये ट्रॅप कॅमेरे वापरून बुद्ध पौर्णिमेला प्राणिगणना करण्यात आली.

**सूत्र** – ‘हुकली पाणवठ्यावरील प्राणिगणना’, https://maharashtratimes.indiatimes.com, २२.०५.२०२०.



---

## माणूस-बिबट्यासंबंधी वृत्त

### अमरावती जिल्हा

### जखमी बिबट्याला पकडण्यात यश; सहा आरोपींना अटक

अचलपूर तालुक्यातील खैरी शिवारात वन व वन्यजीव विभागांनी संयुक्तरित्या कार्यवाही करून नर बिबट्याला पकडले. या बिबट्याचा मागचा पाय लोखंडी सापळ्यात अडकला होता. त्यामुळे त्याच्या पायाला जखम झाली होती.

या प्रकरणी वन विभागाने सहा ठिकाणी छापे घातले व सहा आरोपींना अटक केली. शिकारीसाठी वापरलेला लोखंडी सापळा मध्य प्रदेशातील कटनी भागात सर्रास वापरल्या जाणाऱ्या प्रकारचा असल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले आहे.

**सूत्र** – ‘अमरावती जिल्ह्यात अचलपूर तालुक्यातील खैरी शिवारात बिबट जेरबंद’, https://www.lokmat.com, २५.०४.२०२०.
‘बिबट ट्रॅप प्रकरणी सहा ठिकाणी धाड’, www.tarunbharat.net, २८.०४.२०२०.

## गेल्या तीन महिन्यांतील काही घटना

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अकोला | अकोट | बिबट्याचा सडलेला मृतदेह सापडला. | www.tarunbharat.net, ०९.०५.२०२०. |
| अमरावती | धारणी | विहिरीत बिबट्या पडला. | www.tarunbharat.net, १६.०५.२०२०. |
| | अमरावती | विद्यापीठ परिसरात बिबट्यांचा वावर. | https://www.lokmat.com, १४.०५.२०२०. |
| | तिवसा | विहिरीत मृत बिबट्या. | www.tarunbharat.net, ०७.०५.२०२०. |
| अहमदनगर | श्रीरामपूर | बिबट्याच्या हल्ल्यात शेळ्या ठार. | https://www.lokmat.com, १०.०५.२०२०. |
| | पारनेर | बिबट्याचा बछडा विहिरीत पडला. | https://www.lokmat.com, ०८.०५.२०२०. |
| चंद्रपूर | वरोरा | विडिओकॉन कंपनी परिसरात बिबट्याचे बस्तान. | https://www.lokmat.com, २६.०६.२०२०. |
| जळगाव | चाळीसगाव | शिवारात मृत बिबट्या आढळला. | https://maharashtratimes.indiatimes.com, १४.०६.२०२०. |
| | मुक्ताईनगर | कुत्र्यांच्या हल्ल्यात बिबट्याचा बछडा ठार. | https://maharashtratimes.indiatimes.com, १४.०६.२०२०. |
| नागपूर | पारशिवनी | विहिरीत पडलेल्या बिबट्याची सुटका. | https://www.lokmat.com, २९.०६.२०२०. |
| नाशिक | नाशिक शहर | बिबट्याच्या हल्ल्यात दोन ठार. | https://www.loksatta.com, १८.०६.२०२०. |
| | | भरवस्तीत बिबट्याचे हल्ले; दोन जखमी. | https://www.loksatta.com, ३०.०५.२०२०. |
| | | दाट लोकवस्तीतील रूग्णालयापर्यंत बिबट्या. | https://www.lokmat.com, ०७.०५.२०२०. |
| | नाशिक | बिबट्याच्या हल्ल्यात चार वर्षांचे मूल जखमी. | https://maharashtratimes.indiatimes.com, २९.०६.२०२०. |
| | | गर्दीला बिथरून बिबट्याचा हल्ला. | https://www.lokmat.com, २९.०६.२०२०. |
| | दिंडोरी | बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी. | https://www.lokmat.com, १०.०५.२०२०. |
| | निफाड | वन विभागाने शेतात बिबट्या पकडला. | https://www.lokmat.com, ०७.०५.२०२०. |
| | सिन्नर | दोनपैकी एक बिबट्या वन विभागाने पकडला. | https://www.lokmat.com, ०७.०५.२०२०. |
| पुणे | बारामती | पुन्हा बिबट्याचा वावर. | https://www.loksatta.com, ०१.०७.२०२०. |
| | दौंड | बिबट्याच्या हल्ल्यात शेळयामेंढ्या ठार. | https://www.esakal.com, १७.०५.२०२०. |
| | शिरूर | बिबट्याच्या हल्ल्यात घोडा ठार. | https://www.esakal.com, १२.०५.२०२०. |
| मुंबई | मुंबई उपनगर | आय.आय.टी. मुंबई संस्थेत बिबट्याचा मुक्त वावर. | https://www.loksatta.com, ०२.०६.२०२०. |
| रत्नागिरी | रत्नागिरी | वन विभागाच्या मदतीने ग्रामस्थांनी बिबट्या पकडला. | https://maharashtratimes.indiatimes.com, ३०.०५.२०२०. |
| वर्धा | आर्वी | जाळ्यात रानडुकराऐवजी बिबट्या अडकला. | https://maharashtratimes.indiatimes.com, ०८.०६.२०२०. |

### औरंगाबाद जिल्हा

### बिबट्याच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयासह वन विभागाला उच्च न्यायालयाची नोटीस

पैठण तालुक्यात थेरगाव इथे वन विभागाने केलेल्या कारवाईनंतर झालेल्या बिबट्याच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी उच्च न्यायालयाने केंद्रीय पर्यावरण मंत्रालय, राज्य वन विभाग, औरंगाबाद महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद यांना नोटीस बजावली. त्याचबरोबर एप्रिल महिन्यात किनवट इथे झालेल्या दोन बिबट्यांच्या मृत्यूप्रकरणातील महत्त्वपूर्ण कागदपत्रे न्यायालयात सादर करण्याचे आदेश खंडपीठाने वन विभागाला दिले. हे प्रकरण न्यायमित्राने खंडपीठाच्या लक्षात आणून दिले.

वन विभागाने थेरगावात पकडलेल्या बिबट्याला गौताळा औट्रमघाट अभयारण्यात सोडण्याचे ठरविले. वाहनाने पैठणहून गौताळ्याकडे नेताना वाटेत हा बिबट्या वाहनात निपचित पडून राहिल्याचे दिसून आले. तेव्हा तपासणी केली असता तो मृत झाल्याचे कळले.

वन विभागाने हा बिबट्या पोटात अन्न नसल्याने मेल्याचा दावा केला होता. मात्र, बिबट्याच्या शवविच्छेदनात त्याचा मृत्यू हृदय बंद पडल्याने झाल्याचे स्पष्ट झाले. पशुवैद्यकीय तज्ञांच्या मते, पोटात अन्न नसल्यामुळे बिबट्याचे हृदय बंद पडत नाही. खेरीज, प्रशिक्षित पथकाने बिबट्याला पकडल्याचा दावा वन विभागाने केला असला तरी प्रत्यक्षात हे पथक येण्यापूर्वीच बिबट्याला पकडले होते, असे समोर आले आहे.

'दिशा फाउण्डेशन' या संस्थेने बिबट्याला पकडण्याच्या वन विभागाच्या कारवाईची चित्रफीत पाहून आणखी काही मुद्दे उपस्थित केले, जसे की या कारवाईदरम्यान केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्यात आले नव्हते, बिबट्याला पकडल्यानंतर त्याला भूल दिली व त्याची योग्य काळजी घेतली नाही. भूल देताना बिबट्याच्या मानेवर अनेकजण बसलेले दिसतात.

या संदर्भातील वृत्ताची दखल घेऊन न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्वतःहून या प्रकरणी जनहित याचिका दाखल करून घेतली. तसेच, न्यायालयाने औरंगाबाद महानगरपालिका, वन विभाग यांच्याकडे वन्यप्राण्यांना पकडण्यासाठी पुरेशी साधनसामग्री व प्रशिक्षित मनुष्यबळ आहे काय याविषयी माहिती गोळा करून याचिकेत पूरक दुरुस्ती करण्याची सूचना न्यायमित्रास केली होती.


**सूत्र** – गजानन दिवाण, 'धक्कादायक! निष्काळजीपणे मानगुटीवर बसल्यानेच बिबट्याचा मृत्यू', https://www.lokmat.com, १५.०४.२०२०.
'बिबट्याच्या मृत्यूबाबत स्यू मोटू याचिका : 'लोकमत'मधील वृत्ताची खंडपीठाने स्वतःहून घेतली दखल', https://www.lokmat.com, १६.०४.२०२०.
'बिबट्या मृत्यू प्रकरण : वनखाते, मनपा व पशुवैद्यकीय परिषदेस उच्च न्यायालयाची नोटीस', https://www.lokmat.com, ०१.०५.२०२०.

## चंद्रपूर जिल्हा

### बिबट्या मृत्यू प्रकरणी १९ जणांना अटक

चंद्रपुरातील सावली वन परिक्षेत्रातील बीट शिर्शी नियतक्षेत्रात रानडुकराची शिकार करण्यासाठी लावलेल्या जाळीत अडकून बिबट्याचा मृत्यू झाल्याप्रकरणी १९ आरोपींना अटक करण्यात आली. या सर्वांवर वन्यजीव कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सहा महिन्यांपूर्वी कापसी वाघ शिकार प्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली होती.



**सूत्र** – रवींद्र जुनारकर, 'चंद्रपूर : बिबट्याच्या मृत्यू प्रकरणी १९ आरोपींना अटक', https://www.loksatta.com, ११.०६.२०२०.

## राष्ट्रीय बातम्या

### प्राणिसंग्रहालये व संरक्षित क्षेत्रे आर्थिक अडचणीत

कोविड-१९ च्या प्रसाराला आळा घालण्यासाठी लागू केलेल्या टाळेबंदीचा परिणाम म्हणून भारतातील प्राणिसंग्रहालये, राष्ट्रीय उद्याने आणि व्याघ्र प्रकल्पांसमोर आर्थिक समस्या उभ्या राहिल्या आहेत. परिणामी, देशातील अशा काही प्रकल्पांच्या प्रशासनाने कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी केंद्र सरकारकडे आर्थिक मदत मागितली आहे; तर काही प्रकल्पांनी महसूल निर्मितीसाठी पर्यटन सुरू करण्याची परवानगी मागितली आहे.
राष्ट्रीय उद्याने आणि व्याघ्र प्रकल्पांमधील पर्यटन पावसाळ्याचे चार महिने - जून ते सप्टेंबर या काळात बंद असते. तत्पूर्वी उन्हाळ्यात पर्यटनाचा हंगाम असतो, मात्र यंदा टाळेबंदीमुळे हंगामात महसूल निर्मिती झाली नाही. याचा परिणाम या प्रकल्पांच्या उत्पन्नावर झाला असून आता त्यांची आर्थिक घडी विस्कटली आहे. व्याघ्र प्रकल्पांनी राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणा (National Tiger Conservation Authority) कडे निधीची मागणी केली आहे. प्राणिसंग्रहालयांनी केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणा (National Zoo Authority) कडे पर्यटकांसाठी प्राणिसंग्रहालये खुली करण्याची विनंती केली आहे. प्राधिकरणाने उत्तर प्रदेशातील लखनौ आणि कर्नाटकातील बाणेरघट्टा इथल्या प्राणिसंग्रहालयांना तशी परवानगी दिली आहे. मात्र, कोविड-१९ च्या रूग्णांचा आकडा वाढतच चालल्याने तिथे भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या नगण्यच आहे, अशी माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

**सूत्र** – रिचा शर्मा, 'कोविड-१९ लॉकडाऊनः झूज्, नॅशनल पार्क्स फेस फायनान्शिअल क्रंच; सीक सेंटर्स हेल्प फॉर स्टाफ सॅलरीज्', www.newindianexpress.com, २८.०६.२०२०.

## पर्यावरण संरक्षणाचे निकष डावलून विकास प्रकल्पांना मंजुरी

केंद्रीय वन्यजीव मंडळा (National Board for Wildlife) ने संरक्षित क्षेत्र व पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रातील प्रकल्पांना निकष डावलून मंजुरी देण्याचे धोरण अवलंबल्याचे दिसते. देशात २०१६ ते २०२० या कालावधीत ३,८३० प्रकल्पांना सुमारे ५७ ,४८४. हेक्टर वनजमीन देण्यात आली आहे. २००९ ते मे २०१४ या कालावधीत प्रकल्प नामंजूर करण्याचे प्रमाण ११.९ टक्के इतके असताना जून २०१४ ते २०१९ या कालावधीत ते केवळ १.१ टक्क्यावर आले.

कोविड-१९ च्या टाळेबंदीपूर्वी गेल्या दोन वर्षांपासूनच केंद्रीय वन्यजीव मंडळ स्थायी समितीच्या बैठका दूरचित्रसंवादाद्वारे होत आहेत. २०१८ पासून ते एप्रिल २०२० पर्यंत समितीच्या झालेल्या आठही बैठका दूरचित्रसंवादाद्वारे झाल्या.

संरक्षित क्षेत्र किंवा पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात प्रकल्पांना मान्यता देताना विविध निकष पाळावे लागतात. स्थायी समितीच्या बैठकीत येणाऱ्या प्रस्तावांपैकी साधारणत: ४० टक्के प्रकल्पांसाठी क्षेत्रीय भेट आवश्यक असते. मात्र, दूरचित्रसंवादाद्वारे झालेल्या बैठकीत क्षेत्रीय भेट व सगळे निकष तपासणे शक्य होत नाही. तरीदेखील केंद्रीय वन्यजीव मंडळाने प्रकल्पांना तातडीने परवानगी देण्याचे धोरण आखले आहे.

या गंभीर प्रकारावर केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या १२ माजी सदस्यांसह पर्यावरण क्षेत्रातील तज्ज्ञांनी टीका केली आहे.

**सूत्र** - राखी चव्हाण. 'पर्यावरण निकष डावलून प्रकल्पांना मंजुरी', https://www.loksatta.com, ०५.०६.२०२०.

## टाळेबंदीत भारतात शिकारीच्या प्रकरणांत दुप्पट वाढ

टाळेबंदीच्या काळात देशभरात वन्यजीवांच्या शिकारीची प्रकरणे दुपटीने वाढली. वन्यजीव तस्करी, शिकार यांबाबत काम करणाऱ्या 'ट्रॅफिक' या स्वयंसेवी संस्थेने टाळेबंदीच्या कालावधीतील शिकारींबाबत प्रसिद्ध केलेल्या अहवालात हे निरीक्षण नोंदविले आहे. शिकारीच्या प्रकरणांचे विश्लेषण करण्यासाठी संस्थेने माध्यमांत प्रकाशित झालेल्या बातम्यांचा आधार घेतला.

टाळेबंदीपूर्वीच्या सहा आठवड्यांमध्ये (१० फेब्रुवारी ते २२ मार्च) ३५ प्रकरणे; तर टाळेबंदीच्या सहा आठवड्यांमध्ये (२३ मार्च ते ३ मे) शिकारीची ८८ प्रकरणे समोर आली आहेत. शिकार आणि तस्करीच्या प्रकरणांमध्ये २२२ जणांवर कारवाई करण्यात आली.

खूर असलेल्या (ungulates) प्राण्यांच्या त्यातही हरणाच्या शिकारीचे प्रमाण जास्त आहे. हरणाच्या शिकारीची ३९ प्रकरणे आहेत. खाण्यासाठी या प्राण्यांना मारल्याची नोंद अहवालात आहे. त्याखालोखाल खवलेमांजर (pangolin), शेकरू (giant squirrel), साळिंदर (porcupine) , उदमांजर (otter), माकडे अशा छोट्या प्राण्यांच्या शिकारीचे प्रमाण आहे. खाण्याबरोबरच अंधश्रद्धा, तस्करीच्या उद्देशाने या शिकारी झाल्या असून त्याची संख्या २२ आहे.

'टाळेबंदी' साजरी करत असल्याचे सांगत शिकाऱ्यांनी समाजमाध्यमांवर छायाचित्रे झळकवली. टाळेबंदीपूर्वी मुनिया, पोपट, मैना या पक्ष्यांच्या तस्करीचे प्रमाण १४ टक्के होते ते आता सात टक्क्यांवर आले आहे. मात्र, त्याच वेळी महाराष्ट्रात मोराच्या शिकारींचे प्रमाण वाढले आहे. पक्ष्यांबरोबर कासवांच्या तस्करीतही घट झाली आहे.

**सूत्र** – 'वन्यजीवांच्या शिकारीत वाढ', https://www.loksatta.com, १०.०६.२०२०.

## व्याघ्र प्रकल्पांसह इतर संस्थांना सावधानतेचा इशारा

अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील ब्राँक्स प्राणिसंग्रहालयात चार वर्षांच्या वाघिणीला कोरोना विषाणूची लागण झाल्याचे कळल्यानंतर केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरण आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने देशातील सर्व प्राणिसंग्रहालये तसेच बचाव केंद्र आणि व्याघ्र प्रकल्पांना सावधानतेचा इशारा दिला आहे. याबाबत जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे -

- राज्यांनी आपापल्या पशुवैद्यक विभागांशी सल्लामसलत करावी.
- प्राणिसंग्रहालयातील सर्व कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी संबंधित सरकारी आरोग्य यंत्रणेकडून करून घ्यावी.
- प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांवर २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून नजर ठेवली जावी. सस्तन प्राण्यांचे निरीक्षण अधिक बारकाईने करावे.
- कॅमेरा ट्रॅपच्या माध्यमातून व शक्य त्या सर्व ठिकाणी निरीक्षणातून वाघांच्या श्वसनक्रियेत अडथळा, खोकला आदींची पाहणी करावी.
- कोरोना विषाणूची लागण झाल्याबाबत खात्री करण्यासाठी घेतलेले नमुने तपासणीसाठी मध्य प्रदेशातील भोपाळ इथल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हाय सिक्युरिटी ॲनिमल डिसिज, हरियाणातील हिसार इथल्या नॅशनल रिसर्च सेंटर ऑन इक्विन्स, उत्तर प्रदेशातील बरेली इथे असलेल्या सेंटर फॉर

ॲनिमल डिसिज रिसर्च अँड डायग्नोस्टीक, इंडियन वेटर्नरी रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थांकडे पाठवावेत.

**सूत्र** – 'देशातील प्राणिसंग्रहालयांमध्ये अधिक दक्षता', https://www.loksatta.com, ०७.०४.२०२०.

## वाचकपत्रे

### सह्याद्री नावामागील संस्कृती पाळू या!

प्रिय संपादक मंडळ आणि कल्पवृक्ष कुटुंबीय,
आताच 'संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' वाचले. स्थानिक भाषेतून लोकांपर्यंत माहिती पोचवण्याचा चांगला उपक्रम. अभिनंदन!

आपल्या वार्तापत्रात कृपया 'सह्याद्री' साठी 'पश्चिम घाट' हे नाव वापरू नका. 'सह्याद्री' हे योग्य आणि पूर्वापार चालत आलेलं नाव आहे. इंग्रजीत चुकीने Western Ghat या नावाचा प्रसार झाला आहे. तो सुद्धा बदलला पाहिजे. मराठीत त्याचे शब्दशः भाषांतर कृपया करू नका. 'सह्याद्री' नावामागे संस्कृती आहे. ती गोवा, कर्नाटकातही पाळली जाते. आपणही पाळू या.

धन्यवाद आणि शुभेच्छा!

**- उल्हास राणे,**
संचालक, एन्वायरोडिझाइनर्स प्रा. लि., बंगरुळू

### वनाधिकारी, संशोधकांसाठी उपयुक्त वार्तापत्र

संरक्षित क्षेत्र वार्तापत्राचा पहिला अंक मिळाला, मी तो वाचला. त्यातील सर्व लेखांची उत्कृष्ट अशी मुद्देसूद पद्धतीने मांडणी करण्यात आलेली आहे. हे वार्तापत्र निश्चितपणे वनाधिकारी किंवा संशोधक यांच्यासाठी अतिशय उपयुक्त असे ठरणारे आहे. याच्यामध्ये संपूर्ण महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील पर्यावरणाशी निगडित महत्वाच्या बातम्या आलेल्या आहेत. या वार्तापत्राच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

- **प्रतिक दिलीप नाटेकर,**
पीएचडी रिसर्च स्कॉलर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### Liked the original sections

It's really nice. I liked the original sections - like Girija Godbole's at the end. Perhaps you can do some kind of survey on how this newsletter is being used, for what purpose etc. Also, the original sections can have direct contributions from the community if possible.

- **डॉ. अपर्णा वाटवे,**
वरिष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ, पुणे

### Excellent initiative!

An excellent initiative to have the PA Update in Marathi. I am sure it will be useful to a larger cross section of people. Best wishes.

- **अहाना लक्ष्मी,**
चेन्नई

Thank you so much and, best wishes, for this wonderful work.

- **प्रशांत शिंदे,**
सृष्टीज्ञान, मुंबई

संरक्षित क्षेत्रे आणि त्यातील कर्मचारी वर्गासाठी

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

मदतीचे आवाहन

संरक्षित क्षेत्राचे हे वार्तापत्र निर्माण करताना वाचकवर्गात महाराष्ट्रातील वन कर्मचारी आणि संरक्षित क्षेत्राचे व्यवस्थापन करणारे अधिकारी हा एक मोठा गट असेल, असे लक्षात घेतले आहे. आजही जिथे इंटरनेट पोहोचलेले नाही, अशा दुर्गम भागात पोहोचावे, हा एक हेतू या वार्तापत्राची छापील आवृत्ती काढण्यामागे आहे. आमच्या यादीत अशा काही व्यक्तींचा समावेश आहे. मात्र, ही यादी आणखी मोठी व्हावी, अशी आमची इच्छा आहे. त्याकरता, ही विनंती.

वाचक हो, तुम्हाला दरवर्षी रु. १५० भरून महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्रात व त्याच्या अवतीभवती काम करणाऱ्या वन विभागाच्या कर्मचाऱ्यांसाठी हे वार्तापत्र भेट देता येईल. संरक्षित क्षेत्र/कर्मचारी/अधिकारी किंवा मार्गदर्शक/ग्रामस्थाचे नाव, पत्ता ही माहिती आम्हाला पाठवा. प्रती पोहोचवण्याची जबाबदारी आमची!
संपर्कः संपादकीय पत्ता c/o कल्पवृक्ष किंवा marathipaupdate@gmail.com

NOW AVAILABLE

# The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

## News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by


Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books

**Contents:**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*: Bhimashankar WLS, Bhorgad CR, Bor WLS, Gautala Autramghat WLS, Kolamarka CR, Great Indian Bustard Sanctuary, Gyanganga WLS Jaikwadi Bird Sanctuary, Kalsubai-Harishchandragad WLS, Karnala WLS, Lonar WLS, Mahabaleshwar ESZ, Mahendri Reserve Forest, Mansingdeo WLS, Matheran ESZ, Muniya CR, Nandur Madhmeshwar Bird Sanctuary, Radhanagari WLS, Rehekuri Blackbuck Sanctuary, Sanjay Gandhi NP, Sewri Wetlands, Tansa WLS, Thane Creek WLS, Tipeshwar WLS, Tungareshwar WLS, Umred-Karhandla WLS, Yawal WLS, Melghat TR, Nawegaon-Nagzira TR, Pench TR, Sahyadri TR, Tadoba-Andhari TR, Tigers, General News from Maharashtra




**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra - A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (Shiba Desor); 4) Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line drawings by Ashvini Menon

For copies at 20% discount write to psekhsaria@gmail.com or kvbooks@gmail.com

# दृष्टीकोन

## गोड्या पाण्यातील कासवाचे संवर्धन

कासव म्हटले की समुद्र असे बऱ्याच लोकांना वाटते. पण कासवे जमिनीवर आणि गोड्या पाण्यात सुद्धा राहतात. भारतात कासवांच्या ३४ जाति असून त्यापैकी २४ गोड्या पाण्यातील, पाच समुद्री आणि पाच जमिनीवर राहणाऱ्या आहेत.

कासव हे जगातील सर्वात जास्त संकटग्रस्त प्राण्यांपैकी एक आहे. भारतातील ३४ जातिंपैकी ७५ टक्क्यांहून अधिक जाति संकटग्रस्त प्राण्यांच्या यादीत आहेत. 'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल' (*Nilssonia leithii*) ही त्यातील एक जाति आहे. या जातिसह एकूण तीन जाति फक्त भारतात आहेत. या जातिंना भारतातील प्रदेशनिष्ठ जाति (species endemic to India) म्हणतात.

'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल' ही जाति महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तेलंगण, तमिळनाडू व ओदिशा या राज्यांतील मोठ्या नद्या व क्वचित मोठ्या धरणांच्या जलाशयात आढळते. 'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल' दुर्मीळ असून हे पाहायला मिळणे ही अवघड बाब आहे. तरीसुद्धा बऱ्याच ठिकाणी याची शिकार केली जाते. मासेमारांच्या जाळ्यात ते सापडले तर ते त्याला खाऊन टाकतात.

गोड्या पाण्यातील ही जाति परिसंस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. ज्या पाण्यात कासवांचे प्रमाण जास्त आढळून येते त्या पाण्यातील परिसंस्था अतिशय सुदृढ समजली जाते. मात्र, इतर दुर्मीळ जातिंप्रमाणेच या महत्त्वाची जातिच्या प्राण्यांची संख्या मानवी हस्तक्षेपामुळे सातत्याने कमी होत चालली आहे. नदीच्या पात्राचे सिमेंटीकरण, धरणांची निर्मिती यांमुळे होणारा अधिवासाचा ऱ्हास व शिकार आदी कारणांमुळे 'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल' पृथ्वीतलावरून नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.

हे लक्षात घेऊन या जातिच्या संवर्धनासाठी महाराष्ट्रात गेल्या वर्षभरापासून आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत. राज्यात नागपूर, अमरावती, चंद्रपूर, नाशिक, सातारा, सांगली, पुणे या जिल्ह्यांमध्ये 'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल' आढळते. त्याचा अभ्यास, संवर्धन आणि त्याचे महत्त्व या विषयी जनजागृती करण्यासाठी 'फ्रेश वॉटर टर्टल्स अँड टॉरटोइजेस् ऑफ इंडिया' या संस्थेने प्रकल्प हाती घेतला आहे. त्याचा भाग म्हणून मी या कासवाचे प्रत्यक्ष निरीक्षण, त्याच्या अधिवासाबद्दल माहिती, त्याचा आहार आणि त्याला असलेले धोके यांच्या अभ्यासाला मी सुरुवात केली आहे.


या अभ्यासाचा भाग म्हणून मी 'लीथ्स सॉफ्टशेल टर्टल'विषयी अधिकाधिक माहिती गोळा करीत आहे. तुमच्या परिसरात किंवा ऐकण्या-पाहण्यात या कासवाविषयी काही माहिती असेल; तर मला नक्की संपर्क करा किंवा www.indiabiodiversity.org/ftti या संकेतस्थळावर तुमच्याकडे असलेली माहिती, छायाचित्रे तुम्हाला थेट देता येतील. अशा प्रकारे माहिती गोळा करणे हा 'सिटीझन सायन्स' - ज्याला मराठीत लोकविज्ञान म्हणतात त्या प्रकारचा उपक्रम आहे. या संकेतस्थळाला भेट दिल्यास तुम्हालाही कासवाविषयी इतर लोकांनी केलेल्या नोंदी पाहता येतील.


- **स्नेहा धारवाडकर**

लेखिका 'फ्रेश वॉटर टर्टल्स अँड टॉरटोइजेस् ऑफ इंडिया' संस्थेच्या सहसंस्थापक आणि वन्यजीवशास्त्रज्ञ आहेत.

ई-मेलःsneha.dharwadkar@gmail.com

भ्रमणध्वनीः ९०९९०५१७४६

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004